# १२. प्रवास कचऱ्याचा

संत गाडगेबाबांचा स्वच्छतेविषयीचा पाठ तुम्ही अभ्यासला. एका शाळेतील इयत्ता तिसरीला शिकवणाऱ्या बाईंनी एक उपक्रम राबवला, तो वाचा.

तिसरीच्या वर्गातल्या मुलांनी एक आठवडा दररोज राबून शाळेचे मैदान, शाळेची मागची बाजू, सगळे वर्ग लख्ख केले होते. बाईंनी मुलांना कागदाचे तुकडे, पुठ्ठे, रद्दी पेपर, वाळलेले गवत एका डब्यात टाकायला सांगितले होते. फळांच्या साली, कोई, बिया दुसऱ्या डब्यात टाकायला सांगितल्या होत्या. 'असे का बरे ?' हा प्रश्न अनेक मुलांना पडला होता.

''फळांच्या साली काय अन् कागदाचे तुकडे काय, कचराच ना तो. वेगवेगळं टाकून त्याचं काय करायचं?'' नीलाने बाईंना विचारले.

''मला वाटलंच होतं की तुम्हांला हा प्रश्न पडणार.'' बाई म्हणाल्या.

''कचरा वेगवेगळा करण्याचं कारण आहे. प्रत्येक प्रकारच्या कचऱ्याचा प्रवास वेगवेगळा असतो.'' बाई म्हणाल्या.

''प्रवास ? कचऱ्याचा?'' मुलांना आश्चर्य वाटले.

''आपल्या परिसरातला कचरा डब्यात भरून ठेवला, तर पुढे त्याचं जे काही होतं तो त्याचा प्रवास. हे कागदाचे तुकडे, पुठ्ठे, वाळलेलं गवत – यांच्यापासून काय होतं, माहीत आहे का तुम्हांला? त्यांचा पुन्हा लगदा बनवून वेगवेगळ्या शोभेच्या वस्तू, डब्या, खेळणी, पेन-पेन्सिलींची खोकी असं काय काय बनवता येतं. तसंच त्याचा पुन्हा कागदही बनवता येऊ शकतो.'' बाई म्हणाल्या.

''किती घाण वास येतो या कचऱ्याचा.'' जयंत म्हणाला.

''अरे, जो वास आपल्याला घाण वाटतो, तो वास त्या कचऱ्यातून बाहेर पडणाऱ्या वायूचा असतो. असा वायू घरांमध्ये सरपणाऐवजी इंधन म्हणून वापरता येतो. या सडलेल्या कचऱ्याचं उत्तम खत बनवता येतं. शेतीसाठी असं खत अगदी उपयोगी असतं.'' बाईंनी समजावून सांगितले.

''म्हणजे, कचरा हा नुसता कचरा नाही, त्याचे अनेक उपयोग आहेत. खराब कागदापासून पुन्हा नवा कागद, शोभेच्या वस्तू – मजाच आहे की !'' मुले म्हणाली.

वेगवेगळा कचरा वेगवेगळ्या प्रवासाला जाणार म्हणून तो वेगवेगळाच ठेवायला हवा. सर्व मुलांनी ठरवले, की आपण आपल्या घरीसुद्धा असाच ओला व सुका कचरा वेगवेगळ्या डब्यांत ठेवायचा.

## स्वाध्याय

**प्र. १. तुमच्या घरातला कचरा नीट पाहा. त्यात काय काय असते याची यादी करा. हा कचरा वेगवेगळा करायचा असेल, तर कसा कराल ? कोणता कचरा कोणत्या डब्यात जाईल ते ठरवा. ज्या कचऱ्याविषयी ठरवता येणार नाही तो वेगळा ठेवा.**

**प्र. २. परिसर स्वच्छ करतो, तसे आपणही स्वच्छ राहायला हवे. स्वत:ला स्वच्छ ठेवण्यासाठी तुम्ही काय काय करता ते लिहा.**

**प्र. ३. खालील प्रसंग वाचा. यांतील मुलांकडे स्वच्छतेसाठी लागणाऱ्या काही आवश्यक गोष्टी नाहीत, पण स्वच्छता तर व्हायला हवी. ते काय करू शकतील, ते सुचवा.**

(अ) सुनीता मावशीकडे राहायला आली होती. सकाळी दात घासायला जाताना तिला आठवले, की तिचा ब्रश ती घरीच विसरून आलीय. ती आता दात कसे स्वच्छ करेल ?

(आ) जमील अंघोळ करत होता. दोन तांबे पाणी ओतले अन् त्याच्या लक्षात आले, की साबण संपलेला आहे. आता जमीलला स्वच्छ होण्यासाठी काय करता येईल ?

(इ) रोहित सकाळी उठला. संडासला जाऊन आला. हात धुवायला साबणच नव्हता. आता तो हात कसे स्वच्छ करेल ?


(ई) नखांमध्ये घाण साचून राहते, म्हणून सरांनी नखे कापून यायला सांगितले होते; पण अंबूच्या घरात नेलकटर नव्हते. तिला नखे कापण्यासाठी काय करावे लागेल ?

**वाचा.**

शाळेतील, घरातील कचरा वाहून नेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत) व्यवस्था करत असतात. त्यासाठी काही ठिकाणी घंटागाड्यांची व्यवस्था असते. त्यामध्ये सुका कचरा, ओला कचरा असे भाग असतात. त्यासाठी आपण शाळेत आणि घरी ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा साठवला पाहिजे.

- **वाचा व वर्गीकरण करा.**

केळ्यांच्या साली, कागद, शिळे अन्न, खरकटे, फुटका कप, सडलेली फळे, तुटके पेन, कॅरीबॅग, खराब वहीचा पुठ्ठा, पालेभाज्यांची देठे, फळांच्या साली, तुटकी खेळणी.




**शिक्षकांसाठी :** वैयक्तिक स्वच्छतेसाठी बाजारातल्या महागड्या वस्तूंची गरज असतेच असे नाही, अशी चर्चा मुलांसोबत करता येईल. प्रश्न ३ मधील प्रश्नांना एकच उत्तर 'बरोबर' असेल असे नाही. तसा आग्रह धरू नये.

# १३. प्रकाशातले तारे तुम्ही

• **ऐका. म्हणा. वाचा.**

प्रकाशातले तारे तुम्ही, अंधारावर रुसा
हसा, मुलांनो हसा ।। धृ.।।

तुम्हां बोलवी ती फुलराणी
खेळ खेळती वारा पाणी
आनंदाच्या शिखरावरती, खुशाल जाउन बसा ।। १ ।।

रडणे हा ना धर्म आपुला
हसण्यासाठी जन्म घेतला
भारतभूच्या आदर्शांचा, मनी उमटु दे ठसा ।। २।।

सर्व मागचा विसरा गुंता
अरे उद्याच्या नकोत चिंता
बघा, अरुण तो बाळांनो रे, तुम्हां खुणवितो कसा ।।३।।

**– उमाकांत काणेकर**



**शब्दार्थ :** **आनंदाचे शिखर** – खूप खूप आनंद. **ठसा उमटणे** – मनावर बिंबणे. **चिंता** – काळजी. **अरुण** – सूर्य. **खुणावणे** – खुणेने दाखवणे.

## स्वाध्याय

**प्र. १. तुमच्या शब्दांत सांगा.**

(अ) आनंदाच्या शिखरावर बसणे म्हणजे काय ?

(आ) तुम्हांला कशाची चिंता वाटते ? त्या वेळी तुम्ही काय करता ?

**प्र. २. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलांना कोण बोलवत आहे ?

(आ) कवीने मुलांना कोठे बसायला सांगितले आहे ?

(इ) मुलांच्या मनावर कशाचा ठसा असावा, असे कवीला वाटते ?

(ई) मुलांनी कशाची चिंता करू नये, असे कवीला वाटते ?

(उ) मुलांना कोण खुणवत आहे ?

**प्र. ३. खालील व्यक्तींवर तुम्ही केव्हा रुसता किंवा खूश होता ते प्रत्येकी एकेका वाक्यात लिहा.**

(अ) आई

(आ) बाबा

(इ) आजोबा

(ई) आजी

(उ) मैत्रीण/मित्र

(ऊ) शिक्षक/शिक्षिका

(ए) बहीण/भाऊ

(ऐ) पाळीव प्राणी

**प्र. ४. खालील गोष्टी घडल्यावर तुम्हांला काय वाटते ?**

(अ) बाबा बाहेरगावी गेले.

(आ) ताईने सुंदर पेन दिले.

(इ) शाळेचा अभ्यास पूर्ण झाला नाही.

(ई) रस्त्यात पाय घसरून पडलात.

(उ) तुमच्या वर्गाने खेळाचा सामना जिंकला.

**प्र. ५. शेवटी समान अक्षर असणारे कवितेतील शब्द शोधा व लिहा.**

**उदा.,** फुलराणी - पाणी.

(अ) बसा

(आ) गुंता

**प्र. ६. खालील शब्द वाचा. लिहा.**

कार्य, धैर्य, सूर्य, शौर्य, नर्मदा, पर्यंत, पर्यावरण, सर्व, धर्म, आदर्श.

**प्र. ७. खालील शब्दांतील अक्षरांपासून शब्द तयार करा.**

**उदा.,** भारत - भार, भात, तर.

(अ) शिखरावर

(आ) अंधारावर

(इ) आकाशात

(ई) पाऊसधारा

**प्र. ८. तुमच्या शाळेत ज्या थोर व्यक्तींची छायाचित्रे लावली आहेत, त्यांनी देशासाठी काय केले याची माहिती शिक्षकांकडून करून घ्या. त्यांपैकी एकाची माहिती पाच ते सात वाक्यांत लिहा.**

**प्रात्यक्षिक :** गुंता झालेली दोरी घ्या. गुंता सोडवा.


## आम्ही जाहिरात वाचतो

**या मुलांनो या रे या, लवकर सारे नाटक पाहा !**

**धमाल विनोदी बालनाट्य — माशाचं घोरणं पाहायला विसरू नका.**

**चौकस चिंगी आणि घोरणारा मासा**

उद्या शनिवार दिनांक : २२ एप्रिल
दुपारी : ३.३० वाजता
स्थळ – रंगकला नाट्यगृह, रेणापूर



| | | |
|---|---|---|
| **लेखक** | – | योगेश डिखळे |
| **दिग्दर्शक** | – | रजनी चिपलकट्टी |
| **निर्माती** | – | लता वानखेडे |
| **कलाकार** | – | २२ तडाखेबाज बालकलाकार आणि घोरणारा मासा. |

तिकीटविक्री नाट्यगृहावर रात्री ८ वाजेपर्यंत.
आजच तिकीट खरेदी करा. दर रुपये ५०/–,३०/–

**प्रत्येक तिकिटावर एक चिवडा–पाकीट चक्क मोफत !**

**रेणापूरच्या वर्तमानपत्रात आलेली ही जाहिरात पाहा. काळजीपूर्वक वाचा व उत्तरे लिहा.**

### स्वाध्याय

प्र. १. जाहिरात कशाची आहे ?

प्र. २. बालनाट्याचे नाव काय आहे ? बालनाट्य कोणत्या दिवशी आहे ?

प्र. ३. या नाटकाचे दिग्दर्शन कोणी केले आहे ?

प्र. ४. नाटक कोणासाठी आहे ? ते कशावरून कळते ?

प्र. ५. ज्या दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात आली, त्या दिवशी कोणता वार व तारीख असेल ? ते कशावरून कळते ?


प्र. ६. आजच तिकीट खरेदी करा, असे जाहिरातीत कशामुळे सांगितले असेल ? उद्या तिकीट खरेदी केले तर चालेल का ?

प्र. ७. सुमी तिकीट घ्यायला गेली. तिकीट देताना तिथले काका म्हणाले, ‘‘येताना टोप्या घालून या.’’ त्यांनी टोप्या घालून यायला का सांगितले असेल ?


प्र. ८. प्रत्येक तिकिटावर चिवडा–पाकीट मोफत मिळणार आहे. तुम्हांला चिवडा आवडतो का ? चिवड्याऐवजी काय मिळालेले तुम्हांला जास्त आवडेल ?

## आम्ही पुस्तक बनवतो

- चित्रे पाहा. बोला.









- मुलांनो, वरील प्रत्येक चित्र नीट पाहा.
- चित्रांचा अर्थ समजून घेऊन कोणत्याही एका चित्राचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.
- अशी चित्रे जमवून चित्रांचा अर्थ समजून घेऊन माहिती लिहा किंवा गोष्ट तयार करून लिहा.
- वरील चित्रांप्रमाणे तुमच्या आवडीचे प्रसंगचित्र काढा. त्यावर गोष्ट/कविता लिहा.

**प्रकल्प :** वरील सर्व साहित्य वापरून वर्षभरात तुमचे स्वतःचे पुस्तक तयार करा.

**शिक्षकांसाठी :** शिक्षकांनी एकेक चित्र बोर्डवर लावावे. विद्यार्थ्यांशी चित्रांबाबत बोलावे. कल्पनेने चित्रांचे वर्णन कसे करता येईल याची दिशा द्यावी. मुलांना ते वर्णन, गोष्ट, माहिती व कविता या रूपांत कसे व्यक्त करावे याविषयी मार्गदर्शन करावे.

# १४. खजिनाशोध

कालचा दिवस फारच मजेत गेला. काल शाळेत खजिनाशोधाचा खेळ झाला. त्यामध्ये एखादी वस्तू बाई कुठेतरी लपवतात. ती वस्तू कुठे लपवली आहे, याची माहिती वेगवेगळ्या चिठ्ठ्यांमध्ये लिहून त्या चिठ्ठ्या कुठे कुठे लपवून ठेवतात. मग आपण एकेक चिठ्ठी हुडकत जायचे अन् खजिना शोधायचा.

काल वर्गात आल्याआल्या बाई म्हणाल्या, ''सहा जणांचे दोन **गट** अन् सात जणांचे दोन गट करा.'' मग त्यांनी खजिनाशोधाचे नियम समजावून सांगितले. काळूमाच्या आंब्यापासून ओढ्यापासच्या वावरापर्यंत सगळ्या परिसरात कुठेतरी खजिना ठेवला होता.

बाईंनी सगळ्या **संघांना** एकेक चिठ्ठी दिली. पहिली चिठ्ठी सगळ्या संघांना सारखी होती. 'रोज सकाळी आपण जातो त्या जागेजवळची झुडपं.' 'म्हणजे कुठे ?...' आम्ही विचार करू लागलो.




'समजलं,' म्हणून चिंगी पळत संडासजवळ गेली अन् तिथल्या झुडपांतली चिठ्ठी वाचून धावत परत आली. वाचलेली चिठ्ठी परत तिथंच ठेवायची हा खेळाचा एक नियम होता.

आमचा संघ शाळेच्या गेटबाहेर आल्याबरोबर बोरंवाली आजी मला म्हणाली, ''अगं एऽऽ, शाळा सोडून कुठं चाललंय **टोळकं** ?'' ''आज शाळा बाहेरच आहे.'' चंब्या म्हणाला अन् आम्ही पळत शाळेमागच्या वडाच्या झाडाकडे गेलो. चिठ्ठी शोधायला सगळे झाडावर चढू लागलो, तेवढ्यात आबा म्हणजे चिंगीचे आजोबा ओरडले, ''एऽऽ तुमची **झुंड** झाडावर चढते की काय ?''

पुढची चिठ्ठी वडाच्या झाडाच्या ढोलीत अगदी हाताच्या अंतरावर होती. त्यामुळे फार चढावं लागलं नाही. चिठ्ठी वाचून आमची **पलटण** निघाली परत शाळेत, खिचडीच्या खोलीत. तांदळाच्या

**शिक्षकांसाठी :** गट, संघ, टोळकं, झुंड, पलटण, चमू , टोळी, घोळका हे शब्द समूहासाठी वापरतात. प्रसंगानुरूप या शब्दांचा बोलताना वापर करतात, हे विद्यार्थ्यांना सांगावे.



पोत्यामागची चिठ्ठी आम्ही वाचत होतो, तेव्हा एक **संघ** संडासजवळच्या झुडपांकडे चालला होता. 'म्हणजे त्यांना इतक्या उशिरा कळलं ?'

चिठ्ठी वाचून आम्ही व्हरांड्यातून निघालो तर समोर केंद्रप्रमुख दिसले. '**बालचमू** खुशीत दिसतोय !' ते बाईंना म्हणाले. गेटमधून बाहेर जातोय, तर सरपंचताई समोर. केंद्रप्रमुखांना भेटायला आल्या असाव्या. 'कुठं चाललीय **टोळी** ?' त्यांनी विचारलं. 'आज दोन तास खजिनाशोध आहे', असं ओरडत आम्ही काळूमाच्या आंब्याकडे निघालो. तेवढ्यात ओढ्यापासच्या वावरातून आवाज आला, 'खजिना सापडला!' अन् खाऊचा डबा घेऊन येणारा **घोळका** दिसला. आम्हीपण धावत शाळेकडे आलो, कारण खजिना कुणालाही सापडला, तरी खाऊ सगळ्यांना मिळणार होता.

शब्दार्थ : **हुडकणे** – शोधणे. **वावर** – शिवार, शेत.

## स्वाध्याय

**प्र. १. खजिनाशोधाची ही गोष्ट कोण सांगत असेल – मुलगी की मुलगा ? ते तुम्हांला कशावरून कळले ?**

**प्र. २. खजिनाशोधाच्या दिवशी वर्गातले सगळे विद्यार्थी हजर होते. वर्गातल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या किती ? ही संख्या कशी शोधली, ते तुमच्या मित्रमैत्रिणींना समजावून सांगा.**

**प्र. ३. विजयी झालेल्या संघाने चिठ्ठ्या कोठे कोठे शोधल्या ते क्रमाने लिहा.**

**प्र. ४. खजिन्याच्या खाऊच्या डब्यात काय असेल असे तुम्हांला वाटते ? त्यामध्ये काय असलेले तुम्हांला आवडेल ?**

**प्र. ५. खालील परिच्छेद वाचा. त्यातल्या जाड ठशांतल्या शब्दांकडे पाहा.**

बाईंनी मुलांचे **गट** पाडले. प्रत्येकजण स्वतःला कुठल्यातरी **संघातला** खेळाडू मानत होता. मुलांच्या गटाला बोरंवाली आजी **टोळकं** म्हणाली, तर चिंगीचे आजोबा **झुंड** म्हणाले. केंद्रप्रमुख **बालचमू** म्हणाले, तर सरपंचबाई **टोळी** म्हणाल्या.

एकापेक्षा जास्त संख्येने मुले असतील, तेव्हा **गट, संघ, टोळके, चमू, टोळी, घोळका, पलटण** असे अनेक शब्द वापरले जातात. अशा शब्दांना **समुच्चयदर्शक शब्द** किंवा **समूहदर्शक शब्द** म्हणतात. आता पुढील वाक्ये वाचा व समूहदर्शक शब्द गाळलेल्या जागी भरा.

उदा., अनेक पक्षी उडत आहेत, म्हणजे पक्ष्यांचा **थवा** चाललाय.

(अ) अनिताला एकत्र बांधलेली फुलं भेट मिळाली, म्हणजे तिला फुलांचा ............ मिळालाय.

(आ) मुख्याध्यापकबाईंच्या पर्समध्ये अनेक चाव्या एकत्र बांधलेल्या असतात, म्हणजे त्यांच्या पर्समध्ये चाव्यांचा ............ असतो.

## प्र. ६. जोड्या जुळवा.

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (१) वाहनांचा | (अ) झुबका |
| (२) द्राक्ष्यांचा | (आ) ढीग |
| (३) संत्र्यांचा | (इ) कळप |
| (४) हरणांचा | (ई) घोस |
| (५) फुलांचा | (उ) ताफा |

## प्र. ७. वाचा, समजून घ्या व लिहा.

(अ) चपात्यांची/भाकऱ्यांची – चवड

(आ) पुस्तकांचा/वर्तमानपत्रांचा – गठ्ठा

(इ) धान्यांच्या पोत्यांची – थप्पी

(ई) धान्याची – रास

(उ) भाजीची – जुडी

(ऊ) केळ्यांचा – घड

(ए) माणसांचा – जमाव

## प्र. ८. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(अ) खूप पाहुणे येणार म्हणून आईला भरपूर भाकऱ्या थापाव्या लागल्या. भाकऱ्यांची .......... रचता रचता आई थकून गेली.

(आ) भिकूने दिवसभरात वीस पोत्यांची ............. गोदामातून ट्रकमध्ये हालवली.

---

## ओळखा पाहू ?




* काळ्या रानी उभी तलवार.
* सगळीकडे आहे, जाणवते पण दिसत नाही.
* एवढंसं पोर, घर कसं राखतं.
* एक विहीर, तिला बत्तीस पायऱ्या, त्यामध्ये एकच रस्ता.
* दोन भाऊ शेजारी, भेट नाही संसारी.

**उत्तरे**

डोळे, केसातला भांग, कुलूप, हवा, तोंड (दात, जीभ)

# १५. सुट्टीच्या दिवसांत

• ऐका. म्हणा. वाचा.



सुट्टीच्या दिवसांत वाटते,
खुशाल आकाशात उडावे.
इंद्रधनूच्या घसरगुंडीवर,
खाली-वर, वर-खाली व्हावे.

सुट्टीच्या दिवसांना असतो,
वास निराळा घमघमणारा.
उन्हातही अंगाला बिलगे,
माळावरचा उनाड वारा.

सुट्टीच्या दिवशी जादूने,
अद्‌भुत होते नेहमीचे जग.
मळक्या विटक्या वस्तूंवरती,
नवतेजाची चमके झगमग.

सुट्टीच्या दिवशी शरीरातुन,
प्रचंड शक्ती राही उसळत.
वाटे पोहू साती सागर,
गगनचुंबी ओलांडू पर्वत.

सुटे भान काळाचे सगळे,
सुट्टीमध्ये कसे काय ते-
आठवड्या-महिन्या-वर्षांचे,
कालचक्र मोडूनच पडते !

– अनंत भावे

**शब्दार्थ :** **निराळा** – वेगळा. **बिलगणे** – कवटाळणे, मिठी मारणे. **उनाड** – खोडकर. **अद्‌भुत** – आश्चर्यकारक. **विटका** – रंग उडालेला, रंग फिका पडलेला. **प्रचंड** – खूप मोठा. **उसळणे** – जोराने वर येणे. **गगनचुंबी** – आकाशाला टेकणारा असा उंच, खूपच उंच. **भान** – आठवण, लक्ष.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलाला आकाशात केव्हा उडावेसे वाटते ?

(आ) सुट्‌टीच्या दिवशी कोणत्या घसरगुंडीवर वर-खाली व्हावेसे वाटते ?

(इ) सुट्‌टीच्या दिवसांत नेहमीचे जग कसे होते ?

**प्र. २. खालील शब्दांपुढे कंसातील योग्य शब्द लिहा.**

उदा., घमघमणारा - वास.

(पंख, पाणी, पक्षी, वारा)

(अ) खळखळणारे - ................ (इ) किलबिलणारे - ................

(आ) फडफडणारे - ................ (ई) घोंघावणारा - ................

**प्र. ३. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी लिहा.**

(अ) उन्हात माळावर फिरताना खोडकर वारा अंगाला स्पर्श करून जातो.

(आ) समुद्रातून पोहून जावे, उंच उंच पर्वत चढून जावे.

(इ) सुट्‌टीच्या दिवसांत वेळ कसा गेला हे लक्षात न येणे.

**प्र. ४. चालू वर्षाचे कॅलेंडर घ्या. शाळा सुरू झाली त्या दिवसापासून दिवाळीच्या आधीपर्यंत किती सुट्‌ट्या आहेत ते शोधा. प्रत्येक सुट्‌टीचे कारण पाहा. खालील तक्ता वहीत आखून पूर्ण करा.**

| महिना | साप्ताहिक सुट्‌टी | राष्ट्रीय सणाची सुट्‌टी | धार्मिक कारणासाठी सुट्‌टी (उदा., रमजान ईद, पोळा...) |
|---|---|---|---|
| जून | रविवार | ....... | ....... |
| जुलै | रविवार | ....... | ....... |
| ऑगस्ट | ....... | १५ ऑगस्ट | ....... |
| ....... | ....... | ....... | ....... |
| **एकूण दिवस** | ....... | ....... | ....... |

(अ) कॅलेंडर पाहताना सुट्‌टी पटकन कशामुळे कळते ?

(आ) रविवारशिवाय येणाऱ्या सुट्‌ट्यांमध्ये राष्ट्रीय सणांच्या सुट्‌ट्या जास्त आहेत, की धार्मिक कारणांच्या सुट्‌ट्या ? किती जास्त आहेत ?

(इ) शाळा सुरू झाल्यापासून दिवाळीची सुट्‌टी लागेपर्यंतच्या एकूण सुट्‌ट्यांचा आकडा लिहा.

**प्र. ५. उन्हाळ्याच्या सुट्‌टीत तुम्हांला ज्या गोष्टी कराव्याशा वाटतात, पण मोठी माणसे करू देत नाहीत अशा गोष्टींची यादी करा.**

प्र. ६. उन्हाळ्याच्या सुट्टीत मोठी माणसे तुम्हांला करायला सांगतात, पण तुम्हांला करावीशी वाटत नाहीत, अशा कामांची यादी करा.

प्र. ७. सारखी अक्षरे एकमेकांना जोडून येणारे जोडाक्षरयुक्त शब्द लिहा. जसे – 'सुट्टी.'

प्र. ८. इंद्रधनूच्या घसरगुंडीवर खेळतानाचे चित्र काढा व रंगवा.

प्र. ९. खाली दिलेल्या फळांचा, पदार्थांचा वास घ्या व खा. त्या वासांतील व चवीतील वेगळेपण समजून घ्या.
केळी, आंबा, गाभुळलेली चिंच, आवळा, तापवलेले दूध, भाजलेले शेंगदाणे, भजी, पिकलेला फणस, बोरे.

प्र.१०. योगेश, रहीम, संध्या, रोहन, अपर्णा, दीना या मुलांना सुट्टी आवडत नाही. सुट्टी असली, की योगेशला घरून बाबांना दुकानात डबा पोहोचवावा लागतो; म्हणून त्याला सुट्टी आवडत नाही. इतर मुलांना सुट्टी का आवडत नसेल, याचा विचार करा आणि प्रत्येक मुलाच्या नावडीचे तुम्हांला वाटणारे कारण लिहा.

## आम्ही आमचे अनुभव लिहितो

• वाचा. समजून घ्या.

मुलांनो, तुम्ही अनेक चांगल्या गोष्टी करता. घडलेल्या घटना, प्रसंग तुम्ही मित्रांना, घरी सांगता, पण तुम्ही लिहून ठेवता का ? नाही ना ! काही मुले लिहून ठेवतात. तुम्हांलाही लिहिता येतील. लिहिण्याचा प्रयत्न करा. तुमच्याच वयातील मुलीने लिहिलेला अनुभव शेजारी दिला आहे, तो वाचा.

तुम्हांला आलेले असे अनुभव तुमच्या वहीत लिहा.

रविवारचा दिवस होता. मी दुकानात गेले होते. तेवढ्यात मला दुकानात नानाआजोबा दिसले. हातात पिशवी घेऊन काहीतरी घेत होते. नानाआजोबा एकटे कधी बाहेर पडत नसत. त्यांना पाहून मला आश्चर्य वाटले. मी दुकानाकडे जाऊ लागले.

तेवढ्यात नानाआजोबा दुकानाच्या पायरीवरून उतरत असताना धोतरात पाय अडकून जोरात पडले. मी पळतच त्यांच्याकडे धावले. दुकानदार व दुकानात सामान घेण्यासाठी आलेल्या माणसांनी त्यांना उठवले, पण नानाआजोबांना काही बोलता येईना. मी मोठ्याने 'नानाआजोबा','नानाआजोबा' म्हणत तिथे पोहोचले. दुकानदारकाका लगेच म्हणाले, "बाळ, तू घरी जा अन् कोणालातरी बोलवून आण." त्यांना वाटले, 'माझेच आजोबा आहेत ते.' मी म्हणाले, "हो काका, मी घरी जाते, पण तोपर्यंत तुम्ही त्यांना जवळच्या दवाखान्यात न्या."

मी माझ्या आईला व नानाआजोबांच्या घरी जाऊन काकूंना हे सारे सांगितले. त्या दोघींना घेऊन मी दुकानाजवळ आले. तोपर्यंत लोकांनी नानाआजोबांना दवाखान्यात नेल्याचे समजले. आम्ही दवाखान्यात गेलो. डॉक्टरांनी आजोबांवर औषधोपचार केले. नानाआजोबांना थोडे बरे वाटत होते. काकूंनी त्या सर्वांचे आभार मानले. रिक्षा करून आम्ही नानाआजोबांना घरी घेऊन आलो.

काकू म्हणाल्या, "तुझ्यामुळेच आजोबांना औषधोपचार वेळेत मिळाले." सगळ्यांनी माझे कौतुक केले.

– पाणिनी पाटील, बीड.

# १६. सण – आनंदाचा क्षण

• चित्र पाहा. वर्णन करा.





## स्वाध्याय

• तुमच्या घरी कोणकोणते सण साजरे करतात ? तुम्हांला कोणता सण जास्त आवडतो ? त्या सणाचे वर्णन करा. **वर्णनासाठी प्रश्न –** सणाचे नाव काय ? यावर्षी तो कोणत्या महिन्यात आहे ? त्या सणाची तयारी घरात कशी करतात ? कोण काय काय करते ? या सणाला तुमच्या घरी कोण कोण येते ? तुम्हांला हा सण का आवडतो ? वर्णन लिहा व वर्गात वाचून दाखवा.

• वर्गमित्रांकडून त्यांच्या घरी साजऱ्या केलेल्या सणाचे रीतिरिवाज माहीत करून घ्या.

• ईद, नाताळ असे विविध सण कसे साजरे करतात याची माहिती मिळवा. वहीत लिहा.

## आम्ही असेही बोलतो

• **वाचा.**

१. ''वर्षा, कुठे आहेस गं तू ?'' दादाचा आवाज आला. ''इथेच'' वर्षा म्हणाली. ''इथेच कुठे ? दिसत तर नाहीस.'' दादा तिला शोधू लागला. ''अरे, इकडे वर बघ. **मी** झाडावर बसलेय.'' वर्षा दादाला बोलवू लागली.

२. चेतन दुकानात गेला. सोबत सोमू होता. चेतन दुकानातल्या काकूंना म्हणाला, ''काकू, **तुम्ही** चिंचेच्या गोळ्या ठेवता ?'' दुकानदार काकू म्हणाल्या, ''आहेत की. किती देऊ ?''
''सहा द्या.'' चेतन म्हणाला. ''मी टेकडीवर पळत जाण्याची शर्यत जिंकलो म्हणून मला तीन गोळ्या. हा सोमू दुसरा आला म्हणून याला दोन गोळ्या. **आम्ही** दोघं मिळून पाच गोळ्या घेणार आणि **तो** राजू आहे ना, तो तिसरा आला म्हणून त्याला फक्त एक गोळी.''
''काय तुम्ही मुलं ? टेकडीवर पळण्याची शर्यत काय लावता ? अरे, शर्यत लावण्यापेक्षा तुम्ही सगळ्यांनी तर रोजच पळत टेकडीवर जायला पाहिजे.'' गोळ्या देता देता काकू म्हणाल्या.

वरील दोन्ही प्रसंग नीट वाचा. दादा वर्षाला बोलावताना, 'कुठे आहेस गं **तू** ?' असे म्हणाला. वर्षा मात्र स्वत:विषयी बोलताना, '**मी** झाडावर बसलेय' असे म्हणाली.

दुसऱ्या प्रसंगात चेतन काकूंना '**तुम्ही**' म्हणाला. राजूविषयी बोलताना '**तो**' असं म्हणाला. स्वत:विषयी बोलताना मात्र चेतनने '**मी**' हा शब्द वापरला. तो आणि सोमूविषयी एकत्र बोलताना '**आम्ही**' हा शब्द वापरला.

मराठी बोलताना आपण जेव्हा स्वत:विषयी बोलतो तेव्हा '**मी**' असा शब्द वापरतो. आपल्यासह इतर काहीजणांबद्दल बोलायचे असेल, तर '**आम्ही**' हा शब्द वापरतो. आपल्या मित्रमैत्रिणींशी बोलताना **तू, तुम्ही** असे शब्द वापरले जातात. रिक्षावालेकाका, शिक्षक, मित्रमैत्रिणींचे आईबाबा अशा लोकांविषयी बोलताना '**ते, त्या**' असे शब्द वापरतो.

## स्वाध्याय

• **खालील लोकांशी/लोकांविषयी बोलताना तुम्ही कोणते शब्द वापराल ते विचार करून लिहा.**

| व्यक्ती | व्यक्तीशी बोलताना | त्या व्यक्तीविषयी बोलताना |
|---|---|---|
| आई | तू, तुला, तुझी ...... | तिला, तिने ....... |
| बाबा | | |
| शिक्षक | | |
| मैत्रिणीची आजी | | |
| शाळेतील शिपाई | | |

# १७. रानपाखरा

• **ऐका. म्हणा. वाचा.**

रानपाखरा, रोज सकाळी येसी माझ्या घरा,
गाणे गाउन मला उठविसी मित्र जिवाचा खरा.
शरीर निळसर, शोभे झालर ठिपक्यांची त्यावरी,
सतेज डोळे चमचम करती जणु रत्ने गोजिरी.



पाय चिमुकले, पंख चिमुकले, देह तुझा सानुला,
अफाट आभाळातुन कैसे उडता येते तुला ?
रात्र संपता डोंगर चढुनी वर येतो भास्कर,
तूही त्याच्या संगे येसी गात गात सुस्वर.

तुझ्यासारखे जावे वाटे उडत मजेने वरी
नेशिल का मज तुझ्या बिऱ्हाडी बसवुनि पंखांवरी ?
माय तुझी येईल, सूर्य ही येइल भेटायला,
मजाच होइल सख्या पाखरा, नेइ एकदा मला.

**– गोपीनाथ**



**शब्दार्थ :** **देह** – शरीर. **सानुला** – लहान. **भास्कर** – सूर्य. **संगे** – सोबत. **सुस्वर** – गोड आवाज.
**बिऱ्हाड** – घर. **सखा** – मित्र.

## स्वाध्याय

**प्र. १. कवितेच्या ओळींत शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द लिहा.**

(अ) घरा (इ) सानुला

(आ) त्यावरी (ई) भास्कर

**प्र. २. खालील गोष्टींचे वर्णन करणारे कवितेतील शब्द लिहा.**

**उदा.,** शरीर – निळसर

(अ) डोळे (इ) पंख (उ) आभाळ

(आ) पाय (ई) देह (ऊ) गाणे

**प्र. ३. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलगी रोज सकाळी कोणाला घरी बोलावते?

(आ) रानपाखराचे डोळे कसे आहेत ?

(इ) रानपाखराचा चिमुकला देह बघून कवितेतल्या मुलीला कोणता प्रश्न पडला आहे ?

(ई) सूर्य डोंगर चढून वर कधी येतो ?

(उ) कवितेतल्या मुलीला रानपाखराबरोबर कोठे जायचे आहे ?

(ऊ) कवितेतल्या मुलीला भेटायला कोण येणार आहे ?

(ए) कवितेतल्या मुलीला मजा केव्हा येईल असे वाटते ?

**प्र. ४. कोणाला म्हटले आहे ते लिहा.**

(अ) जिवाचा मित्र (आ) गोजिरी रत्ने

**प्र. ५. कवितेतल्या मुलीला रानपाखरू गाणे गाऊन उठवते. खालील मुले कशी उठत असतील, याची कल्पना करून रिकाम्या जागा भरा.**

**उदा.,** रेश्माला तिची आई उठवते. ती 'रेश्मा, ऊठ लवकर,' अशा हाका मारून उठवते.

(अ) सतीशला मोबाइलच्या गजराने जाग येते. मोबाइल ............ असा आवाज करून उठवतो.

(आ) भिकूचे घर दाट जंगलात आहे. त्याला ............. च्या आवाजामुळे जाग येते.

(इ) रफीकच्या घरामागून रेल्वेची लाइन जाते. तो दररोज ....................च्या आवाजामुळे उठतो. रेल्वे .........................आवाज करत जाते.

(ई) रेवतीचे घर घाऊक भाजीबाजारासमोर आहे. बाजार पहाटेच सुरू होतो. रेवती दररोज .......... अशा आवाजांमुळे उठते.

(उ) जानकीचे घर एस. टी. स्टँडच्या अगदी मागे आहे. त्यामुळे ती दररोज ...................... च्या ............. अशा आवाजामुळे उठते.

(ऊ) जमिलाची आई चादरीच्या कारखान्यात काम करते. त्यांचे घर कारखान्याच्या आवारातच आहे. जमिला रोज ............. च्या आवाजामुळे उठते.

(ए) दिनेशचे बाबा नगरपालिकेच्या बागेचे रखवालदार आहेत. बागेच्या एका कोपऱ्यातच त्यांचे घर आहे. दिनेशला रोज ............. च्या ............. अशा आवाजामुळे जाग येते.

## आम्ही फलक वाचतो




- **वाचा.**

एका शाळेच्या दर्शनी फलकावरील मजकूर इथे दिलेला आहे. तो वाचा. तुमच्या शाळेतील अशा फलकांवर लिहिलेला मजकूर दररोज तुमच्या वहीत लिहा. घरी वाचून दाखवा. तो शिक्षकांना दाखवा.

### सामान्यज्ञान

**करवंद**

करवंद हे आपल्या राज्यात सगळीकडे आढळणारे एक काटेरी झुडूप आहे. उघडी माळराने आणि डोंगराळ भागांत वाढणाऱ्या या झुडपाला चवदार फळे येतात. फळांचा रंग, आकार किंवा चवीवरून करवंदाला कडू करवंद, लिंबू करवंद, लेंडी करवंद, पांढऱ्या करवंद, किरी करवंद अशी नावे दिली आहेत. करवंद पिकल्यावर काळी होतात; पण किरी करवंदे मात्र पिकून गोडसर झाली तरी रंगाने हिरवीच राहतात.

### सुविचार व वार्ताफलक

सुविचार – आधी करा. मग बोला.

वार्ता –


### सूचना फलक

दि. १०/११/२०१४

दि. १४/११/२०१४ रोजी आपल्या शाळेत 'बालदिन' साजरा होणार आहे. त्यानिमित्ताने 'बालसभा' आयोजित केली आहे. बालसभेत ज्यांना भाषण करायचे आहे, त्यांनी आपली नावे वर्गशिक्षकांकडे आजच द्यावी.

मुख्याध्यापक

### प्रदर्शन फलक



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांनी जमवलेली निवडक कात्रणे, गोष्टी, गाणी, काढलेली चित्रे, विनोद इत्यादी शाळेच्या प्रदर्शन फलकावर लावावे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. परिपाठात विद्यार्थ्यांकडून फलकांवरील मजकूर वाचून घ्यावा.

# १८. मजेशीर होड्या

एका जंगलात बरेचसे ठेंगू राहत होते. अगदी छोटेसे. अंगठ्याएवढीच माणसं ती. चंदू, टिनू, चंपू अशी काहींची नावं होती. गावच वसलं होतं त्यांचं. एकदा काय झालं, जंगलाची ती सगळी जागा कुणीतरी विकत घेतली. तिथे घरं बांधायचं ठरलं. कामगारांसाठी तात्पुरती घरं तयार झाली. मग ठेंगू, ससे, चिमण्या, उंदीर सगळ्यांनाच घाईघाईनं ती जागा सोडावी लागली. चिमण्या उडून दुसऱ्या जंगलात गेल्या. ससे थोड्या दूरच्या डोंगरावर गेले. उंदरांनी घरं बांधून होईपर्यंत तिथेच लपून राहायचं ठरवलं, कारण त्यांना माहीत होतं, की कामगारांच्या घरात खायला मिळणारच आहे.



ठेंगू पण एकत्र जमले. त्यांच्या नेत्यानं सांगितलं, 'आपण आपल्या नातेवाइकांकडे – इच्छापूर्तीच्या रानात जाऊन राहू. मला जायचा रस्ता माहीत आहे. एक डोंगर, एक नदी ओलांडली की येतं ते. तिथे खूप जागा, खूप झाडं, खूप खायला, प्यायला आहे. तिथे राहू आपण.'

एका रात्री ते निघाले. रस्ता म्हटला तर जवळचा, पण ठेंगूंना लांबचाच की ! चालून चालून ते नदीकाठी आले. मग आली पंचाईत ! नदी ओलांडायची होती. आता काय करायचं ?

त्यांना भेटला एक ससा. त्यांनी आपली अडचण सशाला सांगितली. ससा म्हणाला, ''इथे एक खूप चांगला, दयाळू मुलगा आहे, बंडू नावाचा. तो त्या घरात राहतो. तो खूप हुशारही आहे. तो करेल मदत. मी एकदा सापळ्यात अडकलो होतो, तेव्हा त्यानंच मला बाहेर काढलं होतं. तुम्ही जाऊन त्याच्या त्या खिडकीवर टक्‌टक् करा. तो उठेल आणि करेल काहीतरी.''

चांदणं पडलं होतं. सगळ्यांना सशानं दाखवलेली घराची खिडकी दिसली. खिडकीला गज होते. ठेंगूंनी सशाचे आभार मानले आणि ते त्या घराकडे निघाले. घराबाहेरच्या सायलीच्या वेलीवरून चढून खिडकीच्या पट्टीवर ते उभे राहिले. बिछान्यावर गाढ झोपलेला बंडू त्यांना दिसला.

ठेंगू चंदूनं खिडकीवर टक्‌टक् केलं. बंडूनं कूस बदलली. चंदूनं पुन्हा टक्‌टक् केलं. बंडू पूर्ण जागा झाला. ठेंगूला खिडकीत पाहून तो इतका थक्क झाला, की त्याला बोलायला सुचेना. मग उडी मारून तो खिडकीपाशी आला.



''अरे वा ! चिमुकल्यांनो ! मला तुम्हांला कधीचं बघायचंच होतं. तुम्ही खरंच आहात न, की मला स्वप्न पडलंय !''

''नाही. तू जागाच आहेस. ऐक जरा. बंडू, आम्हांला सशानं सांगितलंय, की तू प्रेमळ, दयाळू आहेस म्हणून. तू मदत करशील आम्हांला ? आम्ही आपली घरं सोडून इथे आलोय. या नदीपलीकडच्या इच्छापूर्ती रानात जायचंय आम्हांला, पण उडायला पंख नाहीत, की आमच्याजवळ होड्या नाहीत. नदी पार कशी करता येईल ? तू सांगतोस काही उपाय ?'' चंदूनं विचारलं.

''बघतो हं, काय करता येईल मला.'' बंडू लगेच म्हणाला.

बंडूनं थोडा विचार केला आणि म्हणाला, ''बघू या हं. माझ्या होडीचा तुम्हांला काही उपयोग नाही. ती खूपच मोठी आहे. शिवाय माझी वल्ही तुटली आहेत. कागदाच्या होड्या केल्या, तर भिजून बुडतील. हां, चांगलं आठवलं.''

''काय, काय आठवलं?'' सगळ्या ठेंगूंनी एकच गलका केला.

''मी तुम्हांला अक्रोडाच्या टरफलांच्या होड्या करून देतो. त्यांचा आकार तुमच्यासाठी योग्य होईल. एकेकाला एकेक होडी. त्या पाण्यात छान तरंगतात. त्यांना छोटी शिडं मी लावून देईन, म्हणजे वाऱ्यानं त्या पलीकडे नीट पोहोचतील.''

बंडू खाली धावला. सगळे मिळून अकरा ठेंगू होते. त्यानं स्वयंपाकघरातून सहा मोठे अक्रोड आणले. मग ते नीट मधोमध फोडले. आतील भाग ठेंगूंना खायला दिला आणि स्वतः होड्या बनवू लागला.

''घ्या. झाल्या होड्या ! बारा होड्या झाल्या. आता त्यांच्या डोलकाठ्या आणि शिडं बनवतो.''

एका डबीत वापरून झालेल्या काड्यापेटीतल्या काड्या गोळा करून ठेवल्या होत्या, त्या काढल्या. कागदाची शिडं करून ती काड्यांना टाचणीनं टोचली. गोंदानं शिडं डोलकाठीला म्हणजे आगकाडीला घट्ट चिकटवली. होडी तयार झाली. ठेंगू थक्क होऊन आपल्या होड्या बनताना बघत होते. बंडूनं

बघता बघता किती छान होड्या बनवल्या होत्या ! त्याही एक-दोन नव्हेत, चांगल्या बारा ! हुशारच होता तो ! होडी कशी बनवायची ते कळल्यावर ठेंगूंनीही मदत केलीच म्हणा; पण तेवढ्यात चंपूच्या हातांना गोंद लागला आणि त्याला जो - जो सोडवायला म्हणून गेला तो - तो त्याला चिकटला, हे एक नवंच लचांड निर्माण झालं. बंडूनं अखेर पाण्यानं धुऊन, कागदानं पुसून त्यांना सोडवलं म्हणून बरं. मग बंडू त्यांना म्हणाला, ''होड्या झाल्या आहेत बारा नि तुम्ही आहात अकराच; पण मी ही बारावी होडी एका होडीला बांधतो. तुमचं जास्तीचं सामान तुम्हांला तिच्यातून नेता येईल.''



थोड्याच वेळात सगळे नदीकाठी जमले. बंडूनं स्वतःच साऱ्या होड्या एका मोठ्या टोपलीत घालून नदीकाठी नेल्या. एकेका ठेंगूला एकेका होडीत बसवून त्या सावकाश पाण्यात सोडल्या. अगदी डौलात पाण्यातून जात होत्या त्या. ठेंगू खूश झाले होते. चांदण्यांच्या प्रकाशात त्या बारा होड्यांचा ताफा नदीतून जाताना मस्त दिसत होता. अकराव्या होडीला बांधलेली बारावी सामानाची होडीदेखील छान चालली होती. सगळ्या होड्या किनाऱ्यावर गेल्यावर सारे ठेंगू उभे राहिले आणि त्यांनी हात हालवून बंडूचा निरोप घेतला. बंडूही नदीकिनारी उभा राहून त्यांना हात हालवून निरोप देत होता. त्याला समाधान वाटत होतं. 'आता कधीतरी नदीपलीकडे जाऊन या ठेंगूंना भेटेन मी !' बंडू स्वतःशीच म्हणाला.

**- निर्मला मोने**

शब्दार्थ : **थक्क होणे** - नवल वाटणे, आश्चर्यचकित होणे. **शीड** - होडीवर वारा भरण्याकरिता केलेले कापडाचे साधन. **डोलकाठी** - होडीवरील शिडाची काठी. **लचांड** - अडचण, संकट, घोटाळ्यात घालणारे काम.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) ठेंगू खिडकीच्या पट्टीवर कसे पोहोचले ?

(आ) बंडू थक्क का झाला ?

(इ) बंडूने कशाच्या होड्या बनवल्या ?

(ई) कोणते नवे लचांड निर्माण झाले ?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सगळ्यांना घाईघाईने जंगलाची जागा का सोडावी लागली ?

(आ) सशाने ठेंगूंना बंडूचे नाव का सुचवले ?

(इ) ठेंगू खूश का झाले ?

**प्र. ३. बंडूने तयार केलेल्या होडीची कृती लिहा. तुम्हीही तुमच्या मनाने अशी एखादी होडी तयार करा.**

**प्र. ४. गोष्टीतल्या कोणत्या गोष्टींचे तुम्हांला नवल वाटते ? का ?**

**प्र. ५. गोष्टीतला कोणता प्रसंग तुम्हांला आवडला ते सांगून, त्या प्रसंगाचे चित्र काढा.**

**प्र. ६. गोष्टीला 'मजेशीर होड्या' असे नाव का दिले आहे ?**

**वाचा.**

'खिडकीवर, खिडकीला, खिडकीच्या' अशी 'खिडकी' या शब्दाची वेगवेगळी रूपे या पाठात आलेली आहेत. याप्रमाणे 'होडी' या शब्दाची वेगवेगळी रूपे वाचा.

**उपक्रम :**

१. वेगवेगळ्या कागदी होड्या तयार करा व त्यांचे प्रदर्शन भरवा.

२. नाटकाच्या रूपात ही गोष्ट वर्गात सादर करा.

३. बंडूने जसे चांगले काम केले, तसे तुम्ही कोणते चांगले काम केले आहे, याबद्दल वर्गात गप्पा मारा.

**वाचा.**




**नंदू** : गुरुजी, बंडू लक्ष देत नाही. तो सारखा खिडकीबाहेर पाहतो आहे.

**शिक्षक** : काय रे, तुला कसं समजलं ?

**नंदू** : मी सारखा त्याच्याकडे पाहत होतो.

## आम्ही चित्रांवरून गोष्ट लिहितो

- **चित्रे पाहा. गोष्ट सांगा.**





**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्र पाहून मुलांना गोष्ट सांगायला प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक विद्यार्थ्याला गोष्ट लिहायला लावावी. प्रत्येक विद्यार्थ्याकडून गोष्ट वाचून घ्यावी. (या गोष्टीत दगडाखाली पाच रुपयांचे नाणे व चिठ्ठी ठेवलेली आहे.) त्यांना वर्तमानपत्रे, मासिके यांतून चित्रकथा संकलित करायला सांगावे. त्यांचे वाचन वर्गात करून घ्यावे.

## आम्ही असे खेळ खेळतो

- चित्रे पाहा. वर्णन करा.

लपंडाव



पोत्यातल्या उड्या



चमचा-लिंबू



तळ्यात-मळ्यात



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रांतील खेळ प्रत्यक्ष घ्यावे. विद्यार्थ्यांकडून या खेळांची माहिती काढून घ्यावी. या खेळांविषयीची अधिक माहिती शिक्षकांनी द्यावी व इतर खेळांची माहिती सांगावी. उदा., सुरपारंब्या, विटीदांडू, लगोरी इत्यादी. असे खेळ कसे खेळतात याचे प्रात्यक्षिक करून घ्यावे. विद्यार्थ्यांमध्ये मैदानी खेळांविषयी आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

# १९. सुगी

• ऐका. म्हणा. वाचा.

रानातल्या बोरीला
वाजून आली थंडी,
काट्यांतून लगडली
बोरे सात खंडी.


वळणावरचे झाड
थरकापू लागले,
खट्टे मिठ्ठे पेरू
जागोजाग लोंबले.

ओलीचिंब झाली
हरभऱ्याची राने,
पानांतले पोपट
गाऊ लागले गाणे.

चिंचेचे हातपाय
काकडून झाले वाकडे,
जाळीतून डोकावले
गाभुळले आकडे.

थंडी आली पेटवा आगटी
शेका हात गार,
शेकता शेकता तोंडात टाका
ओल्या शेंगा चार.

**– शैला लोहिया**



शब्दार्थ : **सुगी** – पिकांचा हंगाम. **लगडणे** – बहर येणे. **खंडी** – वीस मण म्हणजे एक खंडी. **थरकाप उडणे** – भीतीने अंग थरथर कापणे. **खट्टे मिठ्ठे** – आंबटगोड. **काकडणे** – थंडीने अंग कापणे. **डोकावणे** – वाकून बघणे. **गाभुळणे** – पिकण्याच्या अवस्थेत येणे. **आगटी** – शेकोटी.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) गाणे कोण गाऊ लागले ?

(आ) चिंचेचे हातपाय कसे झाले आहेत ?

(इ) आगटी कधी पेटवतात ?

(ई) गार हात शेकता शेकता काय करायला सांगितले आहे ?

**प्र. २. थंडीमुळे कोणाला काय झाले ते लिहा.**

(अ) वळणावरचे झाड (आ) हरभऱ्याची राने (इ) लोकांचे हात

**प्र. ३. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) खट्टे मिठ्ठे | (अ) बोरे |
| (२) काट्यांतून लगडलेली | (आ) शेंगा |
| (३) शेकोटीभोवती खाल्ल्या जाणाऱ्या | (इ) पेरू |

**प्र. ४. काटेरी झाडांची नावे लिहा.**

**प्र. ५. आंबा, बोर, पेरू, चिंच यांपैकी प्रत्येक फळापासून तुमच्या घरी काय काय बनवले जाते, ते लिहा.**

**प्र. ६. तुमच्याशी चिंचेचे झाड बोलू लागले तर ? कल्पना करून लिहा.**

**प्र. ७. खालील फळांतील बियांना तुम्ही काय म्हणता ते लिहा.**

(अ) चिंच (आ) आंबा (इ) डाळिंब (ई) कलिंगड (उ) बोर

**प्र. ८. प्रत्येकी दोन फळांची नावे लिहा.**

(अ) एक बी असलेली फळे.

(आ) अनेक बिया असलेली फळे.

**प्र. ९. कवितेला 'सुगी' शीर्षक का दिले असावे असे तुम्हांला वाटते ?**

**वाचा.**

वृक्ष आपले मित्र आहेत. ते आपल्याला फळे, फुले, सावली देतात. त्यांची काळजी घेणे व रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे.

**उपक्रम :** 'झाडे लावा, झाडे जगवा' यासारखी घोषवाक्ये मिळवा व संग्रह करा.

# २०. एक भारतीय संशोधक



शंकर नावाचा एक छोटा मुलगा होता. एकदा त्याला दुकानातून साखर आणायला सांगितले. तेव्हा दुकानदाराने वजनमापात खोटेपणा करून शंकरला कमी साखर दिली. शंकरने हुज्जत घातली, पण दुकानदाराने त्याचे काहीच ऐकले नाही. वडिलांनीही आरोप केला, 'वाटेत तू साखर खाल्लीस म्हणून ती कमी झाली.'

शंकरच्या मनाला ती गोष्ट चांगलीच लागली. खरे वजन मापणारे यंत्र आपण तयार करावे, असे त्याच्या मनात तेव्हापासून सतत घोळत राहिले. हाच शंकर पुढे डॉ. शंकर आबाजी भिसे नावाचा वैज्ञानिक म्हणून प्रसिद्ध झाला.

डॉ. शंकर आबाजी भिसे यांचा जन्म २९ एप्रिल, १८६७ रोजी मुंबईत झाला. तो काळ पारतंत्र्याचा होता. त्या काळी भारतीय माणसाला प्रत्येक ठिकाणी कमी लेखले जाई. शास्त्रीय संशोधन क्षेत्रात तर त्याला अजिबात स्थान नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीत पुढे डॉ. भिसे शास्त्रज्ञ म्हणून नावारूपाला आले.

१८९७ चा जुलै महिना शंकररावांच्या आयुष्यात क्रांती घडवणारा ठरला. ते ज्याच्यासाठी धडपडत होते ती संधी अचानक चालून आली. अनेक वर्षांचे स्वप्न साकार होणारा असा तो प्रसंग होता. इंग्लंडमधील एका शास्त्रीय मासिकात एक स्पर्धा जाहीर झाली होती. ही स्पर्धा वजनमापक यंत्राबद्दल होती. 'एकाच वेळी हव्या तेवढ्या वजनाची साखर, मीठ किंवा त्यासारख्याच इतर वस्तू यांचे मोजमाप करता येण्याची सोय त्यात असावी,' अशी अट होती. यंत्र शोधून काढणाऱ्यास बक्षीस होते. भिसे यांच्या वाचण्यात ते आले; पण त्या वेळी यंत्राचा आराखडा पाठवण्याची मुदत लवकरच संपणार होती. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता, आराखडा तयार करून तो इंग्लंडला रवाना केला आणि काय आश्चर्य! भिसे यांच्या यंत्राचा आराखडा सर्वश्रेष्ठ ठरला. त्यांना बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप व अमेरिकेतील नामवंत यंत्रशास्त्रज्ञांनी भाग घेतला होता.

काही दिवसांनी अमेरिकेतील 'सायंटिफिक अमेरिकन' या मासिकात सदरहू शोधाचा खास उल्लेख करण्यात आला. ही बातमी शेट एन. एम. गोकुळदास यांनी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले व दिनशा वाच्छा यांना दाखवली. त्यांनी शंकररावांना प्रोत्साहन देऊन इंग्लंडला जाण्यास मदतही दिली. भिसे १८९९ मध्ये इंग्लंडला गेले.

डोक्यात आलेल्या कल्पना रेंगाळत न ठेवता त्याप्रमाणे काहीतरी बनवून पाहण्याची सवय शंकररावांना लहानपणापासून होती. ते दहा वर्षांचे होते तेव्हाची गोष्ट. त्यांनी एक मजेशीर प्रयोग केला. लांब अंतरावरच्या दोन ठिकाणांना जोडणारी एक तार बांधली. तिच्या टोकांना घंटा बांधून ठरावीक पद्धतीने ठोके वाजवले, की हवा तो संदेश ठोक्यांच्या भाषेत पाठवता येईल, अशी त्यांची कल्पना होती. त्यांनी त्यांची कल्पना प्रत्यक्षात उतरवली.

वयाच्या १५ व्या वर्षी शंकररावांनी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे एक उपकरण बनवले. बराच वेळपर्यंत चार दिवे जळण्यास पुरेसा गॅस या यंत्रावर तयार होत असे. बालपणापासून शंकररावांची स्वाभाविक प्रवृत्ती शास्त्रीय आणि कलाकौशल्यांकडेही होती. शाळेतील घोकंपट्टीचा त्यांना मनस्वी कंटाळा होता.

इंग्लंडमध्ये भिसे यांनी प्रामुख्याने छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. इंग्लंडला बरीच वर्षे राहिल्यावर भिसे अमेरिकेला गेले. अमेरिकेत त्यांनी 'ऑटोमिडिन' (ॲटोमिक आयोडिन) या गुणकारी औषधाचा शोध लावला. पहिल्या महायुद्धात या औषधाचा जखमी सैनिकांवर उपयोग करण्यात आला. अमेरिकेत हे औषध लोकप्रिय झाले.

भिसे यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त न्यूयॉर्कमध्ये अनेक संस्थांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. संशोधन क्षेत्रात बहुमोल कामगिरी केल्याबद्दल त्यांना सन्मानपूर्वक पदव्या देण्यात आल्या. या सुमारास डॉ. भिसे यांची जगप्रसिद्ध संशोधक एडिसन यांच्याशी भेट झाली.

भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. या वेळी 'स्वयंचलित तोफ' काढण्याची विनंती काही कारखानदारांनी डॉ. भिसे यांना केली. स्वयंचलित तोफ तयार करण्याचे त्यांनी नम्रतापूर्वक नाकारले व मानवतेच्या भूमिकेतून होणारा संहार आपल्या परीने वाचवला.

डॉ. भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य आपल्या सर्वांना सदैव प्रेरक ठरेल, यात शंका नाही. अमेरिकेत न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल, १९३५ रोजी त्यांचे निधन झाले.

**– ज. बा. कुलकर्णी**

**शब्दार्थ :** **हुज्जत घालणे** – वाद घालणे. **आरोप** – आळ. **मनाला लागणे** – वाईट वाटणे. **मनात घोळत राहणे** – नेहमी आठवणीत राहणे. **आराखडा** – कच्ची आकृती. **विलंब** – उशीर. **रवाना करणे** – पाठवणे. **नामवंत** – नावाजलेले. **संहार** – विनाश. **प्रेरक** – उत्तेजन, प्रोत्साहन देणारा.

## स्वाध्याय

**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) खरे वजन मापणारे यंत्र तयार करावे, असे डॉ. भिसे यांना का वाटले ?

(आ) डॉ. भिसे यांना परदेशी जाण्यासाठी कोणी कोणी प्रोत्साहन दिले ?


(इ) स्वयंचलित तोफ तयार करण्यास डॉ. भिसे यांनी का नकार दिला ?

**प्र. २. विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.**

(अ) पारतंत्र्य × (इ) खोटेपणा ×

(आ) कमी × (ई) प्रतिकूल ×

**प्र. ३. चित्रे पाहा. चित्रांत काय काय दिसते ते सांगा. वजनकाट्यांविषयी शिक्षकांकडून अधिक माहिती मिळवा.**



**उपक्रम :**

१. कोणत्याही तीन भारतीय शास्त्रज्ञांची नावे लिहून त्यांची छायाचित्रे जमवा. ती 'आमचे पुस्तक'मध्ये चिकटवा. शिक्षकांच्या मदतीने त्यांच्याविषयी माहिती मिळवा.

२. विविध वस्तूंचे वजन कसे केले जाते, याचे बाजारात फिरून निरीक्षण करा व वहीत नोंद करा.

**प्रात्यक्षिक :**

१. कोणतीही साधने वापरून एक वजनकाटा तयार करा.

२. वेगवेगळ्या वस्तूंचे वजन वर्गात करून दाखवा.

३. एक लीटर पाण्याच्या रिकाम्या बाटलीचे वजन करा. पाणी भरून बाटलीचे वजन करा. एक लीटर पाण्याचे वजन किती ते सांगा.

**माझा फोन**

आपण आपला मजेशीर फोन बनवूया. या फोनला 'चार्जिंग' करावे लागत नाही, की 'रेंज' लागत नाही. खर्चही अगदी कमी येतो.

**साहित्य :** आइस्क्रीमचे/चहाचे दोन रिकामे कागदी कप, भरपूर लांब दोरा, सुई किंवा टाचणी.

**फोन बनवायचा कसा ?**

१. दोन्ही कपांच्या तळाच्या मध्याला सुईने बारीक छिद्र पाडा.

२. दोऱ्याच्या एका टोकाला गाठ मारून दोरा एका कपाच्या तळातून ओवून घ्या.

३. दोऱ्याचे दुसरे टोक दुसऱ्या कपाच्या तळाच्या छिद्रातून काढा. त्यालाही गाठ मारा. झाला फोन तयार.

**फोन वापरायचा कसा ?**

हा फोन एका वेळी दोनच जणांना वापरता येतो. दोन मुलांनी एकमेकांपासून लांब उभे राहावे. प्रत्येकाच्या हातात एकेक कप धरावा. दोरा पूर्णपणे सरळ ताणलेला हवा. आता एकाने कपामध्ये बोलावे. त्या वेळी दुसऱ्याने कानाला कप लावावा. आवाज ऐकू आला का ? आता तुम्ही बोला. दोऱ्यामधून जसा आवाज येतो तसाच तारेमधूनपण जातो.

## आम्ही चित्र वाचतो

- **चित्रे पाहा. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.**



## स्वाध्याय

प्र. १. कोणत्याही एका चित्राचे वर्णन तुम्ही तुमच्या शब्दांत लिहा.

प्र. २. तुम्ही पाहिलेल्या एका प्रसंगाचे चित्र काढा. त्याचे वर्णन ७-८ वाक्यांत लिहा.

# २१. दोस्त

• **ऐका. म्हणा. वाचा.**

माझी एक गाय होती, तिला होते वासरू,
तोच माझा दोस्त होता, त्याला कसे विसरू !

मीही व्हायचो गुबगुबीत दूध पिऊ-पिऊ,
दोघांसाठी एक पान्हा, आम्ही भाऊ-भाऊ.

दूध पिऊन झाल्यावर तो वारा पिऊन उंडारला,
की माझा बाप पाठवायचा मलाच त्याला धुंडायला.

आम्ही असे उंडारताना भिंगरीच्या पायाने,
गाय पाहायची दोघांकडे सारख्याच मायेने.

हिरवे हिरवे गवत कोवळे कोवळे लूस.
त्याच्यासाठी आणले की गडी व्हायचा खूश.

कोवळ्या-कोवळ्या जिभेने अंग माझे चाटायचा,
ओठावरचा फेस त्याच्या साय मला वाटायचा.

पाहत राहायचा माझ्याकडे जाताना मी शाळेत,
माझाही गुंतलेला जीव त्याच्या नाळेत.

आज जेव्हा पाहतो मी भावा-भावांचं फाटताना,
आठवत राहतो दोस्त माझा अंग माझं चाटताना.

**– इंद्रजित भालेराव**



**शब्दार्थ :** **गुबगुबीत** – बाळसेदार. **उंडारणे** – मस्ती करणे, मनसोक्त उड्या मारणे. **धुंडणे** – शोधणे. **कोवळे लूस** – मऊ, टवटवीत. **फाटणे** – वितुष्ट येणे, दुरावा निर्माण होणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवीचा दोस्त कोण ?

(आ) कवीने भाऊ कोणाला म्हटले आहे ?

(इ) दूध पिऊन झाल्यावर वासरू काय करत असे ?

(ई) वासरू केव्हा खूश व्हायचे ?

(उ) कवीने साय कशाला म्हटले आहे ?

**प्र. २. शेवटचे अक्षर समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

**उदा.,** वासरू - विसरू

(अ) पिऊ-पिऊ

(आ) उंडारला

(इ) पायाने

(ई) चाटायचा

(उ) शाळेत

(ऊ) फाटताना

**प्र. ३. वाक्यांत उपयोग करा.**

(अ) उंडारणे.

(आ) धुंडाळणे.

(इ) भिंगरीच्या पायाने.

(ई) भावा-भावांचे फाटणे.

(उ) गुबगुबीत होणे.

**प्र. ४. खालील शब्दांसाठी त्याच अर्थाचा तुम्हांला माहीत असलेला शब्द सांगा.**

(अ) दोस्त

(आ) खूश

(इ) बाप

(ई) शाळा

**प्र. ५. 'हिरवे हिरवे गवत' तसे खालील शब्दांसाठी तुम्हांला आवडतील ते शब्द लिहा.**

(अ) निळे निळे ........................

(आ) काळे काळे ........................

(इ) कोवळे कोवळे ....................

(ई) गार गार ..........................


(उ) उंच उंच ..........................

**उपक्रम :** गाईम्हशी पाळणाऱ्या लोकांच्या घरी भेट द्या. ते त्यांच्यावर कसे प्रेम करतात, तसेच पाळलेले इतर प्राणी घरच्या माणसांवर कसे प्रेम करतात ते त्यांना विचारा व मिळालेली माहिती वर्गात सांगा.

# २२. मधमाशीने केली कमाल!

एक होता शेतकरी. तो शेतात खूप कष्ट करायचा. शेताभोवती त्याने झाडे लावली होती. त्या झाडांवर मधमाशी, कोकिळा, खारूताई, चिमणी व कावळा राहत होते. त्या झाडाभोवती मुंग्याही राहत होत्या. त्या सर्वांची खूप मैत्री होती.

एके दिवशी एक मुंगी बाहेर फिरायला गेली. फिरता फिरता ती शेतात पोहचली. शेतात होती सूर्यफुले-पिवळीधमक, टपोरी आणि टवटवीत. मुंगीला फुले खूप आवडली.



ती गेली शेतकऱ्याकडे. त्याला म्हणाली, ''शेतकरीदादा, शेतकरीदादा काम करता सदान्‌कदा, करणार का यंदा फुलांचा धंदा ?''

शेतकरी म्हणाला,

''हो गं बाई, करतो ना धंदा. फुले तोडतो, बिया वाळवतो. तेलासाठी बिया पेरतो. सर्वांसाठी कष्ट करतो.''

शेतकऱ्याचे बोलणे ऐकून मुंगीच्या मनात एक विचार आला. तिने शेतकऱ्याकडून एक फूल घेतले. घरी आली, फुलातल्या बिया काढल्या. काही बिया कोकिळेला दिल्या. काही बिया खारूताईला दिल्या. काही चिमणीला, तर काही बिया कावळ्याला नि मधमाशीला दिल्या. स्वतःही काही घेतल्या. त्यांतल्या काही बिया खाल्ल्या आणि पुढच्या वर्षी खाण्यासाठी काही बिया जपून ठेवल्या. कोकिळेच्या कपाळावर आल्या आठ्या. तिने कावळ्याच्या घरट्यात ठेवल्या बिया. कावळ्याने बिया पाहिल्या. तो म्हणाला,




''का ग बाई असं करतेस ? अंड्यांबरोबर बियाही ठेवतेस ?
नको माझ्या घरट्यात बिया, सगळ्या बिया जातील वाया.''

कावळ्याने बिया उचलल्या आणि टाकून दिल्या. चिमणीने पाहिल्या बिया. बसली बिया सोलायला. सोलता सोलता कंटाळा आला. 'काय बाई त्रास' म्हणत निघून गेली खेळायला. खारूताई होती खूप चपळ, सारखी तिची पळापळ. बिया घेऊन झाडाच्या शेंड्यावर गेली. प्रत्येक बी लपवून ठेवली. शेंड्यावरून जमिनीवर, जमिनीवरून शेंड्यावर. खेळता खेळता बी अन् बी खाऊन टाकली.



मधमाशी होती मोठी चतुर. काम करण्यास नेहमीच आतुर.

बिया पाहून विचारात गढली.



'करावे काय बियांचे ?
भले व्हावे सर्वांचे.
उपाय काही सुचेना,
झोप काही लागेना.'



सकाळ होताच चटकन उठली. बिया घेऊन जमिनीवर आली.

आनंदाने गाऊ लागली – ''या रे या मित्रांनो, खड्डा करूया गड्यांनो.''

कावळा म्हणाला, ''कशासाठी, कशासाठी ?''

मधमाशी म्हणाली, ''बिया रुजत घालण्यासाठी.''

यावर कोकिळा म्हणाली,



''मला नाही वेळ.
कामाचा अन् माझा
कधी बसायचा मेळ ?''

कोकिळा गेली उडून, चिमणी राहिली झोपून.

कावळा म्हणाला,

''माझ्याच्याने होणार नाही.
काम करून दमलोय बाई.''



खारूताई आली सरसर. डोळे फिरवत गरगर. मधमाशीला म्हणाली,

''ताई, ताई थांबतेस का जरा?
बघ, सुटलाय छानसा वारा.
खेळून घेते पोटभर,
तोपर्यंत काम तूच कर.''

मग मधमाशीने बिया रुजत घातल्या. पावसाळा आला. पाऊस पडला. बिया रुजल्या. रोपटी भरभर वाढू लागली. त्याला पिवळी फुले आली. फुले वाऱ्यावर डोलू लागली. फुले पाहून मधमाशी आनंदाने गाऊ लागली –



''रुजत घातल्या बिया चार,
त्याला आली फुले फार.
कामाची धरा रे कास,
तरच मिळेल पोटाला घास.''

**शब्दार्थ : रुजत घालणे –** जमिनीत बी लावणे. **कामाची कास धरणे –** काम करण्यास तयार होणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सूर्यफुलाचे वर्णन करणारे शब्द कोणते ?
(आ) मुंगीने शेतकऱ्याला कोणता प्रश्न विचारला ?
(इ) मुंगीला फूल का आवडले ?
(ई) चिमणी खेळायला का निघून गेली ?

**प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडांवर कोण कोण राहत होते ?
(आ) मुंगीने कोणाकोणाला बिया दिला ?

**प्र. ३. कोणी केले ते लिहा.**

(अ) बिया दुसऱ्याच्या घरट्यात ठेवल्या.
(आ) बिया सोलल्या.
(इ) सगळ्या बिया खाल्ल्या.
(ई) बिया टाकून दिल्या.
(उ) बिया रुजायला घातल्या.

**प्र. ४. कशासाठी ते लिहा.**

(अ) मधमाशी सर्वांना बोलवत होती.
(आ) मुंगीने बिया जपून ठेवल्या.
(इ) खारूताई शेंड्यावर गेली.
(ई) शेतकरी बियांतून तेल गाळतो.

**प्र. ५. कोण म्हणाले ?**

(अ) फुले तोडतो, बिया वाळवतो.
(आ) सगळ्या बिया जातील वाया.
(इ) कशासाठी ? कशासाठी ?
(ई) तरच मिळेल पोटाला घास.

**प्र. ६. विविध तेलबियांची नावे लिहा व संग्रह करा.**

**उपक्रम :** मधमाशीबद्दलची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

# २३. रमाई भीमराव आंबेडकर



रमाईंचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील वणंद गाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धुत्रे होते. आईचे नाव रखमाबाई असे होते. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. अशा वातावरणात त्यांचे बालपण गेले.

भीमराव रामजी आंबेडकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. सासरी त्यांचे नाव रमाबाई ठेवले. भीमरावांना सगळे बाबासाहेब म्हणत. १९०७ साली बाबासाहेब मॅट्रिक झाले. मुंबईतील पोयबावडी येथील चाळीत ते राहण्यास गेले. बाबासाहेबांनी रमाईंना घरीच लिहायला-वाचायला शिकवले.

बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ती घेऊन बाबासाहेब १९१३ साली शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. त्यांनी पदवी प्राप्त केली. तेव्हा रमाईंचे सासरे रामजी मालोजी आंबेडकर व दीर आनंदराव यांचे निधन झाले होते. त्यामुळे कुटुंबाची सगळी जबाबदारी रमाईंवर पडली. रमाईंचा स्वभाव मितभाषी, दृढनिश्चयी आणि स्वाभिमानी होता. त्या कर्तव्यनिष्ठ व स्वसुखत्यागी होत्या. अशा खडतर स्थितीतही मनाची शांतता नि घरातील एकोपा अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी फार कष्ट सोसले. बाबासाहेबांच्या अनुपस्थितीत त्यांच्या विधवा भावजयीला व तिच्या मुलाला त्यांनी अंतर दिले नाही. त्यांचे उत्तम प्रकारे पालन-पोषण केले. हालअपेष्टांतही कधी कुरकुर केली नाही. काटकसरीने प्रपंच करून पतीच्या अभ्यासात अडचण येईल, अशी एकही गोष्ट त्यांनी केली नाही.

दीन-दलित समाजाचे भवितव्य सुधारण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह रमाईंनी स्वतःला झिजवले. खूप दुःखे वाट्याला आली, तरी रमाईंनी कधी खंत बाळगली नाही. प्रसंगी एखादे सुख वाट्याला आले, तर त्या हुरळूनही गेल्या नाहीत. रमाईंना कारुण्याची मूर्ती असे संबोधले जाते. त्यांच्यासमोर संकटांचे डोंगर उभे होते, तरी त्या कधीही डगमगल्या नाहीत. त्यांनी शांतपणे सर्व संकटे झेलली. आपल्या दुःखांकडे दुर्लक्ष करून इतरांचे दुःख दूर केले.

बाबासाहेबांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग विषमता दूर करण्यासाठी केला. देशात दीन-दलितांवर खूप अन्याय आणि अत्याचार होत असत. त्यांचा इतरांकडून नेहमी अपमान होत असे. त्यांना मानसन्मान व मानवी हक्क मिळावेत म्हणून सामाजिक न्यायाचा लढा उभारला. त्यांनी सामाजिक कार्यासाठी जीवन वाहून घेतले होते. अशा परिस्थितीत रमाईंनी संसाराचा गाडा समर्थपणे चालवला. त्यांनी आपल्या पतीस मोलाची साथ दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वकिली व्यवसायात नाव कमावले. भारतीय राज्यघटना मसुदा समितीचे ते अध्यक्ष होते. त्यांनी मसुदा समितीत खूपच परिश्रम घेतले, म्हणून त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे म्हणतात. 'बहिष्कृत कार्यकारिणी सभे'ची स्थापना करून पददलितांच्या स्वावलंबन, स्वाभिमान नि आत्मोद्धारासाठी वसतिगृहांची स्थापना केली. सोलापूर येथे पहिले वसतिगृह सुरू झाले. पुढे त्यांनी शिक्षणसंस्थाही सुरू केली.

रमाईंनी धारवाड येथील वसतिगृहास भेट दिली. त्या वेळी तेथील वसतिगृहात त्यांना अन्नधान्याचा तुटवडा दिसला. मुलांना खायला एकही दाणा नव्हता. दुकानदाराचे वाणसामानाचे बिल थकले होते. त्या वेळी क्षणाचाही वेळ न दवडता रमाईंनी हातातल्या सोन्याच्या बांगड्या वसतिगृह प्रमुखांकडे दिल्या. त्या मोडून त्यातून आलेल्या पैशांनी धान्य व आवश्यक ते सगळे सामान आणले. जेवणाची व्यवस्था करून मुलांना प्रेमाने जेवायला दिले. असा प्रसंग पुन्हा येऊ नये, म्हणून त्यांनी पुढच्याही काही दिवसांची बेगमी होईल एवढे अन्नधान्य भरून ठेवले. रमाईंच्या प्रेमाने, वात्सल्याने वसतिगृहातील सर्व मुले भारावून गेली. त्यांच्या कारुण्याचा ओलावा सगळ्यांनी अनुभवला. रमाई दीन-दलितांच्या आई व बहुजनांच्या सावली झाल्या.

सर्वांना आधार देण्याची रमाईंची वृत्ती होती. स्वतःची सर्व स्वप्ने विसरून कुटुंबाच्या व समाजाच्या उज्ज्वल स्वप्नांना साकारण्यासाठी त्या शेवटपर्यंत झगडल्या. त्यांची जिद्द आजही सर्वांना प्रेरणादायी ठरते.

(रमाईंच्या माहेरचे आडनाव धोत्रे असेही लावले जाते.)

**– डॉ. करुणा जमदाडे**

**शब्दार्थ : राज्यघटना –** संविधान. **बेगमी –** साठा. **वात्सल्य –** प्रेम, माया.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) रमाईंना कोणी लिहायला-वाचायला शिकवले ?
(आ) डॉ. आंबेडकर शिक्षणासाठी कुठे गेले होते ?
(इ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजासाठी कोणता लढा उभारला ?
(ई) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून आपण कोणाला ओळखतो ?
(उ) बाबासाहेबांनी वसतिगृहे का काढली ?
(ऊ) वसतिगृहातील सर्व मुले का भारावून गेली ?

**प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ‘भारतीय घटनेचे शिल्पकार’ का म्हणतात ?
(आ) रमाईंनी वसतिगृहात अन्नधान्याचा तुटवडा दिसल्यावर काय केले ?

**प्र. ३. कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द निवडून वाक्ये लिहा.**
**(वणंद गाव, आई व बहुजनांच्या, कारुण्याची, गरिबीची)**

(अ) रमाईंचा जन्म दापोली तालुक्यातील .................. येथे झाला.
(आ) रमाईंच्या घरची परिस्थिती अत्यंत .................. होती.
(इ) रमाईंना .................. मूर्ती संबोधले जाते.
(ई) रमाई दीन-दलितांच्या ............................ सावली झाल्या.

**शिक्षकांसाठी :** भारतीय संविधानाची उद्देशिका पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला दिली आहे. त्याचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगावा.

**प्र. ४. खालील वाक्प्रचार असलेली पाठातील वाक्ये शोधा व पुन्हा लिहा.**

(अ) खंत न बाळगणे (आ) हुरळून जाणे (इ) न डगमगणे (ई) भारावून जाणे.

**प्र. ५. विरुद्‌ध अर्थाचे शब्द लिहा.**

(अ) अन्याय × (आ) अपमान × (इ) दुर्लक्ष ×

**उपक्रम :**

१. थोर महिलांची चित्रे मिळवा. चिकटवहीत चिकटवा आणि चित्रांखाली चार-पाच ओळींत माहिती लिहा.

२. तुमच्या परिसरातील अथक परिश्रम करून मुलांना शिकवणाऱ्या एखाद्या महिलेची मुलाखत घेऊन माहिती मिळवा. वर्गात सांगा.

३. तुमच्या शाळेत दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना रमाई यांच्याबद्‌दलची अधिक माहिती शिक्षकांकडून मिळवा.

४. कर्मवीर भाऊराव पाटलांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी मोठे कार्य केले आहे. त्यांनी मुलांसाठी रयत शिक्षण संस्था स्थापन करून शाळा, वसतिगृहे स्थापन केली. वसतिगृहातील मुलांसाठी त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांनीही मोठा त्याग केला. शिक्षकांच्या मदतीने त्यांच्याविषयी माहिती मिळवा.

- **वाचा.**

**रिकाम्या चौकोनात योग्य अक्षरे लिहून योग्य शब्द तयार करा.**

१. कारल्याची चव. ☐☐

२. चहा पिण्यासाठी वापरतात. ☐☐

३. गव्हाचे पीठ. ☐☐☐

४. पदार्थ तळतात ते भांडे. ☐☐☐

५. लाकूड कापण्याचे एक हत्यार. ☐☐☐☐

**वाचा.**



**शिक्षक :** मधू, तू तुझ्या आईचं सगळं ऐकतोस का ?

**मधू :** गुरुजी, मी तर आई सांगते त्याच्या दुप्पट ऐकतो.

**शिक्षक :** ते कसं काय ?

**मधू :** आई जेव्हा मला डब्यातून एक लाडू घ्यायला सांगते, तेव्हा मी चक्क दोन लाडू घेतो.

# २४. ट्रॅफिकदादा

• ऐका. म्हणा. वाचा.

ट्रॅफिकदादा, सांगा सांगा,
तुमची भाषा आम्हांला सांगा.

छोट्यांचा ऐकून एकच गलका,
ट्रॅफिकदादा म्हणाले, 'ऐका.'

दिसता समोर लाल दिवा,
गाडीला तुमच्या ब्रेक लावा.

खांबावर दिसता पिवळा दिवा,
इकडे तिकडे नीट लक्ष ठेवा.

हिरवा दिवा लागेल तेव्हा,
गाडी तुमची पुढे चालवा.


लावाल वाहन 'नो पार्किंगला',
होईल दंड नक्कीच तुम्हांला.

खूप धूर वाहन सोडता,
दुरुस्ती करा वेळ न लावता.

पाळा नियम वाहतुकीचे,
संकट ना येई 'ट्रॅफिक जाम'चे.

वेगावरती ठेवा नियंत्रण,
अपघाताला नको निमंत्रण.

**– मुबारक शेख**




**शब्दार्थ :** **ट्रॅफिक** – रस्त्यावरील वाहतूक. **पार्किंग** – वाहने ठेवण्याचे ठिकाण. **ट्रॅफिक जाम होणे** – वाहनांची गर्दी होणे. **नियंत्रण** – ताबा, संयम.

## स्वाध्याय

**प्र. १. समान अक्षराने शेवट होणारे कवितेतील शब्द शोधा व लिहा.**

**प्र. २. खालील प्रसंगी काय करावे ?**

**ट्रॅफिक सिग्नलचा –**

(अ) लाल दिवा लागला (आ) पिवळा दिवा लागला (इ) हिरवा दिवा लागला

**प्र. ३. खालील प्रसंगी तुम्ही काय कराल ?**

(अ) गर्दीमध्ये तुम्ही हरवलात.

(आ) रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला तुम्हांला जायचे आहे.

(इ) शाळेच्या रिक्षात मित्राचा डबा राहिला.

**प्र. ४. वर्गामध्ये, घरी चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**


(अ) आपल्याकडे रस्त्याने चालताना कोणत्या बाजूने चालणे अपेक्षित आहे ?

(आ) रस्त्याच्या कोणत्या बाजूला बसथांबे असतात ?

(इ) एस. टी. चा दरवाजा उघडत नसेल, तर संकटकाळी बाहेर पडण्याचा दरवाजा कुठे असतो ?

(ई) संकटकाळी धावती रेल्वे थांबवायची असल्यास प्रवासी काय करतील ?

**प्र. ५. खालील चित्रे पाहा. शिक्षकांच्या मदतीने खालील चित्रांचा अर्थ समजून घ्या व माहिती वहीत लिहा.**




**उपक्रम :** शिक्षक, कुटुंबातील व्यक्ती यांच्यासोबत रस्त्यावर फिरून रस्त्यावरील वाहतूकविषयक वेगवेगळ्या खुणा पाहा. तेथील दृश्ये पाहा. खुणांचा अर्थ समजून घ्या.

## आम्ही नकाशा वाचतो

- **पाहा. सांगा.**




**शिक्षकांसाठी :** या चित्रात एका गावाचा एक भाग दाखवला आहे. या चित्रावर आधारित तोंडी प्रश्न विचारावे. गावाच्या एका भागाचा नकाशा कसा असतो, हे या चित्राच्या मदतीने सांगावे. नंतर विद्यार्थ्यांच्या मदतीने वर्गाचा नकाशा फलकावर काढावा. विद्यार्थी राहत असलेल्या ठिकाणाचा नकाशा काढण्यास सांगावे. नकाशा काढण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

# २५. चित्रे

माजघरातील फरशी पुसून झाल्यावर आई दमून गेली. तिने बिम्मला 'मोठ्या रस्त्यावर जाऊ नको', म्हणून बजावले व ती तिथेच आडवी झाली. बब्बी शेजारी गेली व बिम्मला एकटे वाटू लागले.

तो इकडे तिकडे रेंगाळला. मग तो सोप्यावर आला. खुर्चीवर उभे राहून त्याने बाहेरचे कपाट उघडले. त्यात गमतीच्या पुष्कळच वस्तू होत्या. हिरवी पारदर्शक काचेची दौत, तांबड्या मेणबत्त्या, जुने बंद असलेले घड्याळ, रंगीत दोरे, निळ्या-हिरव्या मण्यांचा झगा घातलेली पण एक हात मोडलेली काचेची बाहुली, अंग दाबताच पत्र्याच्या बटणामधून 'कुई' करणारे रबरी बदक; पण त्या साऱ्यांत बिम्मला फार आवडला तो रंगीत खडूंचा डबा ! त्याने दोन मोठे खडू घेतले व तो हलकेच माजघरात आला.

स्वच्छ केलेल्या फरशीचे मोठे चौकोन जणू त्याचीच वाट पाहत थांबले होते. तो मांडी घालून खाली बसला आणि वाकून चित्रे काढू लागला. थोड्याच वेळात जवळजवळ सगळी फरशी भरून गेली. इतक्यात आई जागी होऊन उठून बसली आणि समोरचे सारेकाही पाहून तिने कपाळाला हात लावला.



''आत्ताच मी फरशी पुसून ठेवली होती, काय ही गिजबिज करून ठेवली आहेस तू?'' ती थोड्या वैतागाने म्हणाली.

''ही गिजबिज नाही. सगळी चित्रं आहेत.'' बिम्म म्हणाला, पण त्याचा चेहरा उतरला. तेव्हा आई त्याला समजावत म्हणाली, ''बरं, ही गिजबिज नाही, मग तर झालं. तू ही कसली चित्रं काढली आहेस, ते तरी सांग मला.''

मग बिम्म खुलला व म्हणाला, ''हे राहुल हत्तीचं चित्र आहे. तो फिरायला निघाला आहे. या त्याच्या दोन घंटा.''

घंटा हत्तीपेक्षा थोड्या मोठ्याच होत्या. हत्तीची शेपटी व त्याची सोंड सारखीच असल्यामुळे हा हत्ती ट्रामप्रमाणे असावा असे आईला वाटले. ती म्हणाली, ''आणि ते दुसरं चित्र ?''

''अगं ते आपलं घर नव्हे का ?'' आश्चर्य दाखवत बिम्म म्हणाला, ''तू, बब्बी, बाबा, मी सगळेजण बाहेर थांबलो आहोत.''

आईला वाटले, 'होय, सगळ्यांना बाहेर थांबणं जरूरच आहे.' घर इतके लहान होते, की बिम्मला देखील वाकून आत जाता आले नसते. बाबांचे हात पावलापर्यंत लांबले होते. जागा कमी पडल्यामुळे आईला बब्बीच्या गुडघ्यापर्यंतच्या उंचीवर समाधान मानावे लागले होते. त्यापुढील चित्रांत पुष्कळशा उभ्या रेघांचा गुंतवळा होता; पण त्यांच्यात चार गोल होते, म्हणजे मागच्या बाजूला आवारात भेटणारे आजोबा या चित्रात चाळिशीमधून पाहत होते. मग बाजार होता. शाळा सुटली होती. तीन कोंबडे होते, पण आईला चित्रकलेतील काही माहीत नसल्यामुळे तिला सगळेच विचारून घ्यावे लागले. बिम्म कडेचे चित्र कसले, ते सांगत होता, तेव्हा धपाधपा पावले आपटत बब्बी परत आली. फरशीकडे पाहताच सुरकुत्या आणत, नाक उंचावून ती म्हणाली, ''काय घाण फरशी करून ठेवली आहेस तू !''

बिम्मने तिच्याकडे रागाने पाहिले. तो चित्राकडे वळला. त्या चित्रात काड्यांप्रमाणे उंच पाय असलेली, रुंद स्कर्ट घातलेली एक मुलगी होती व डोक्यातून बाण गेल्याप्रमाणे तिच्या लहान वेण्या दोन्ही बाजूंना ताठ होत्या. तिच्या हातात दप्तर होते.

''ही आहे बब्बी, ती शाळेतून आली आहे.'' बिम्म म्हणाला.

अशा वेळी आई नेहमी बोटांनी ओठ झाकून घेत असे. ती म्हणाली, ''पण तिच्या पायावर काय आहे ते ?''

बब्बीकडे पाहत बिम्म म्हणाला, ''तिच्या पायावर एक बेडकी आहे.''

त्यावर बब्बीने दणादण पावले आपटली व ओरडून ती म्हणाली, ''आत्ताच मी तुझी सगळी चित्रं पुसून टाकते बघ. मग बस गाडग्यासारखं तोंड करून !''

''मग मी तुझ्या दुसऱ्या पायावरसुद्धा बेडकी काढतो बघ.'' बिम्म म्हणाला.

बिम्मचे शब्द ऐकताच बब्बी एकदम आकसली आणि नाक उंचावत त्याला वेडावून दाखवत आत गेली. तिथून ती पुन्हा ओरडली, ''बकासुर !'' आता आईसुद्धा जाण्यासाठी वळली; पण बिम्मने तिला थांबवले व म्हटले, ''आई, आणखी एक चित्र, मी तुला काढूनच दाखवतो.''

एका फरशीवर त्याने एक उभी रेघ काढली. त्यावर डोके काढले, गुडघ्याखाली पोहोचणारे हात काढले, त्यांना पालवी फुटल्याप्रमाणे पावलांच्या, बोटांच्या जागी लहान रेघा आल्या. मग बिम्मने पुन्हा रेघा ओढून एक मुलगा दाखवला. अनेक गोल काढत त्याने त्यांचा एक ढीग दाखवला आणि मान वर करून आईच्या चेहऱ्याकडे पाहिले.








''आता हे काय आहे?'' तिने विचारले.

''अगं, हा मी बिम्म नव्हे का ? आणि ती तू आई आहेस. तू ढीगभर लाडू केले आहेस आणि तू बिम्मला एक..., एक नव्हे दोन लहान लहान लाडू देत आहेस !'' बिम्मने समजावून सांगितले.

आता मात्र आई मोठ्याने हसू लागली. ती म्हणाली, ''असं आहे का हे चित्र ? लबाड चित्रकार ! आई बिम्मला लाडू देत आहे का ? छान !''

मग तिने डबा उघडला आणि बिम्मला दोन लहान लाडू दिले. ''हे तुझं चित्र मात्र अगदी खरं खरं झालं बघ !'' ती म्हणाली.

– जी. ए. कुलकर्णी

**शब्दार्थ :** **माजघर** – घराचा मध्यभाग. **रेंगाळणे** – घोटाळणे, मागे राहणे. **पारदर्शक** – प्रकाश पलीकडे जाऊ शकणारे. **गिजबिज** – न कळणारे. **चेहरा उतरणे** – नाराज होणे. **ट्राम** – विजेवर चालणारी प्रवासी गाडी. **गुंतवळा** – एकमेकांत गुरफटणे. **पालवी** – झाडास फुटलेली कोवळी पाने.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आईने बिम्मला काय बजावले ?
(आ) बिम्मचा चेहरा का उतरला ?
(इ) बिम्मने काढलेला हत्ती ट्रामप्रमाणे असावा, असे आईला का वाटले ?

**प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कपाटात गमतीच्या कोणकोणत्या वस्तू होत्या ?
(आ) बिम्मने बब्बीचे चित्र कसे काढले होते ?
(इ) 'हे तुझं चित्र मात्र अगदी खरं खरं झालं बघ !' असे आई का म्हणाली ?

**प्र. ३. 'का' ते लिहा.**

(अ) थोड्याच वेळात जवळजवळ सगळी फरशी भरून गेली.
(आ) बब्बीने दणादण पावले आपटली.
(इ) आई मोठ्याने हसू लागली.

**प्र. ४. बिम्मने काढलेल्या चित्रांची यादी करा.**

**प्र. ५. वाक्यांत उपयोग करा.**

(अ) कपाळाला हात लावणे. (आ) चेहरा उतरणे. (इ) गाडग्यासारखे तोंड करणे.

**प्र. ६. तुमच्या आईचे किंवा बाबांचे चित्र काढा. त्यांच्याविषयी चार–पाच वाक्ये लिहा.**

**प्र. ७. खालील शब्दांना 'कार' जोडून शब्द लिहा.**

**उदा.,** चित्र – चित्रकार

(अ) शिल्प

(आ) नाटक

(इ) संगीत

(ई) नकला

**प्र. ८. हे शब्द असेच लिहा.**

पुष्कळ, पारदर्शक, मेणबत्त्या, चौकोन, पुसून, आश्चर्य, गुडघा.

**प्र. ९. बिम्मच्या कपाटात गमतीच्या कोणकोणत्या वस्तू होत्या ते तुम्ही या पाठात वाचले. तुमच्या कपाटात किंवा दप्तरात असलेल्या वस्तूंची नावे लिहा. त्यांपैकी तुम्हांला खूप आवडणाऱ्या वस्तूचे चित्र काढा व रंगवा. ती वस्तू तुम्हांला का आवडते, ते लिहून वर्गात सर्वांना वाचून दाखवा.**

**प्र. १०. बब्बीला वाटते, की बिम्म गाडग्यासारखे तोंड करतो, म्हणजे तो कसे तोंड करत असेल ? बिम्मची नक्कल करून दाखवा. खालील प्रसंगी तुम्ही कसे तोंड करता ते वर्गात सर्वांना करून दाखवा.**

(अ) खूप आनंद झाल्यावर.

(आ) खूप राग आल्यावर.

(इ) आवडीचा खाऊ कुणीतरी पळवल्यावर.

(ई) शिक्षकांनी कौतुक केल्यावर.

(उ) वाईट वाटल्यावर.

(ऊ) भीती वाटल्यावर.

**प्र. ११. तुमचे आई–बाबा तुमच्यावर रागावले आहेत, हे तुम्ही कशावरून ओळखू शकता ?**

**उपक्रम :**

१. वर्गात मुलांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरवा.

२. जी. ए. कुलकर्णी यांचे 'बखर बिम्मची' हे पुस्तक मिळवा. वाचा. त्यातील गोष्टी मित्रांना सांगा.

- **खालील वाक्ये वाचा.**

१. ''आत्ताच मी तुझी सगळी चित्रं पुसून टाकते बघ. मग बस गाडग्यासारखं तोंड करून !''

२. ''हे तुझं चित्र मात्र अगदी खरं खरं झालं बघ !''

वरील वाक्यांत वाक्य संपल्यावर आपण '!' असे चिन्ह दिले आहे. आपण आपल्या मनातल्या भावना, विशिष्ट शब्दांतून व्यक्त करतो. त्या शब्दांनंतर किंवा वाक्य पूर्ण बोलून झाल्यावर '!' असे चिन्ह दिले जाते. आश्चर्य, आनंद, दुःख, प्रशंसा व्यक्त करताना शब्दाच्या किंवा वाक्याच्या शेवटी '!' असे चिन्ह दिले जाते. '!' या चिन्हाला उद्‌गारवाचक चिन्ह म्हणतात.

- **वाचा.**

१. अरे वा ! किती सुंदर अक्षर आहे तुझं !

२. बापरे ! केवढा मोठा साप तो !

# २६. रोपटे

खेळाचा तास सुरू झाला. मुले गटागटाने खेळू लागली. पिंकी, मीनल आणि राहुल यांनी एक गट केला होता. पप्पू त्यांच्या गटाजवळ येऊन म्हणाला, ''अरे, मला घ्या ना तुमच्या गटात खेळायला.'' राहुल म्हणाला, ''काही नको, आमच्या गटात नकोस तू.'' पिंकी म्हणाली, ''राज्य आले तर तू घेत नाहीस. चिडका आहेस नुसता.'' त्यावर पप्पूने 'माझ्यावर राज्य आलं, तर घेईन' असे कबूल केले. मग त्यांनी शिवाशिवीच्या खेळाला आरंभ केला. पहिलेच राज्य मीनलवरती आले. तिने सर्वांच्या मागे धावण्यास सुरुवात केली. तिच्या हाती कोणीच येईना.

पप्पू तर मीनलची गंमतच करत होता. मीनल शिवण्यासाठी जवळ आली, की धूम पळायचा. पुन्हा शांत उभा राहायचा. असे बराच वेळ चालू होते. मीनल थकून गेली. ती एका दगडावरती जाऊन बसली. पप्पू पुन्हा गंमत करण्यासाठी तिच्याजवळ गेला. मीनलने त्याच्यावर झडपच घातली. पप्पू धपकन खाली पडला.

पप्पू होताच चिडचिड्या स्वभावाचा. राज्य घेण्यास त्याने नकार दिला. त्याच्या अशा वागण्यामुळेच त्याला खेळात कोणी घेत नव्हते. 'पप्पू खेळात असला, की खेळाचा बट्ट्याबोळ होतो.' असे सर्वजण म्हणू लागले. 'मी खाली पडलो म्हणून माझ्यावर राज्य आलं, असं राज्य मी घेणार नाही.' असे म्हणून तो राज्य टाळू लागला. ठेंगा दाखवून पुढे पुढे चालू लागला. त्याच्यामागे सगळा गट




'राज्य घे, राज्य घे.' म्हणत जाऊ लागला. सगळ्यांचा गलका ऐकून पप्पू एकदम शांत झाला व एका बाजूला जाऊन बसला. पप्पूच्या मनात विचार सुरू झाले. 'माझ्यावर राज्य आलं, की मी चिडतो. राज्य घ्यायला टाळाटाळ करतो. सगळ्यांना त्रास देतो. अशानं मला कुणीच खेळायला घेणार नाही. मी एकटा पडेन. पुढच्या वेळी खेळताना असं नाही करायचं. राज्य आलं तर घ्यायचं.' त्याच्या मनात अपराधीपणाची भावना डोके वर काढत होती.

पप्पू लांब जाऊन एकटाच बसल्याने सर्वजण त्याच्याकडे पाहत होते. तेवढ्यात तो तिथून उठला व वर्गाकडे निघाला. तो आपल्याच विचारात दंग होता. शाळेच्या परिसरात लावलेल्या एका नाजूक रोपट्यावर त्याचा नकळत पाय पडला. नाजुकल्याचा शेंडा मोडला. ते रोपटे मीनलने लावलेले होते.

रोपाचा शेंडा मोडल्याचे सर्व मुलांनी पाहिले, हे पप्पूच्या लक्षात आले. आपल्याकडून चूक झाली. मुले आता गुरुजींना सांगणार.

आपल्याकडून नकळत चूक झाली हे खरे; पण आता दीक्षितगुरुजींना समजताच ते खूप रागावतील. या विचाराने पप्पूची घाबरगुंडी उडाली. खेळाचा तास संपला होता. सर्व मुले वर्गात आली. गुरुजीही वर्गात आले. सर्व मुले खाली बसली. पप्पू मात्र उभा राहिला अन् म्हणाला, ''गुरुजी मला माफ करा, माझ्याकडून चूक झाली. मीनलच्या लहानशा रोपट्यावर माझा पाय पडला. त्याचा शेंडा तुटला.'' हे सांगताना पप्पूला रडू आवरत नव्हते. त्याचे ओठ थरथर कापत होते. पायसुद्‌धा लटलट करत होते. गुरुजींकडे बघण्याची त्याची हिम्मत होत नव्हती.

गुरुजी त्याचे बोलणे शांतपणे ऐकत होते; परंतु गुरुजी पप्पूला थोडेसुद्‌धा रागावले नाहीत. मुलांना नवल वाटले. त्यांनी पप्पूला जवळ बोलावले. त्याची प्रेमाने विचारपूस केली व म्हणाले, ''चुका होत असतात; पण त्या प्रामाणिकपणे कबूल करायला धैर्य लागतं. ते तू दाखवलं आहेस. पप्पू, तुझं चालताना लक्ष नव्हतं, म्हणून तुझा पाय रोपावर पडला. शेंडा तुटला. तुझ्याकडून नकळत चूक झाली आणि तू कबूलही केलीस. हे ऐकून बरं वाटलं मला. रोप लहानाचं मोठं होईपर्यंत खूप काळजी घ्यावी लागते, तेव्हा ते मोठं होतं. तुमची आईसुद्‌धा तुम्ही लहानाचे मोठे होईपर्यंत तुमची खूप काळजी घेते बरं ! उद्या शाळेत येताना मी दोन रोपं आणणार आहे. त्यांना वाढवण्याची जबाबदारी पप्पू तुझी !''



दुसऱ्या दिवशी शाळेत येताना गुरुजींनी पप्पूला देण्यासाठी दोन रोपे आणली. ती पप्पूला दिली आणि त्या रोपांची देखभाल करण्याची संपूर्ण जबाबदारी घ्यायला सांगितले. ती त्याने मोठ्या आनंदाने स्वीकारली.

आता मुलांच्या सर्व लक्षात आले. एका रोपट्याच्या बदल्यात दोन रोपटी... ! पप्पूला तर आकाश ठेंगणे वाटले. आता त्याचे ओठ थरथरत नव्हते. पाय लटपटत नव्हते. तो उत्साहाने गुरुजींकडे पाहत होता. सर्व मुलांना पप्पू म्हणाला, ''माझी काल चूक झाली; पण माझी आता तुम्हांला एक विनंती आहे, मला आपल्या खेळगटातून काढू नका. मी खेळात चिडचिडेपणा करणार नाही. माझ्यामुळे खेळाचा बट्ट्याबोळ होणार नाही.'' पप्पूची चूक त्याच्या लक्षात आल्यामुळे सर्व मुलांना पप्पूचे बोलणे पटले. सर्वांनी त्याला आपल्या खेळगटात सामील करून घेण्यास संमती दर्शवली.

दीक्षितगुरुजी म्हणाले, ''मुलांनो, एक गोष्ट सांगायची राहून गेली. ज्या रोपट्याचा शेंडा पप्पूकडून

तुटला, त्याला नवीन धुमारे फुटतील, रोप जिवंत राहील अन् मोठंही होईल ! मी ते रोप स्वतः पाहून आलो आहे.'' हे ऐकून मुलांना आनंद झाला.

**– गेणू शिंदे**

**शब्दार्थ :** **आरंभ** – सुरुवात. **धूम पळणे** – जोराने पळणे. **झडप घालणे** – वेगाने एखाद्याला पकडणे. दुसऱ्याच्या अंगावर उडी मारणे किंवा धावणे. **ठेंगा दाखवणे** – चिडवण्यासाठी अंगठा दाखवणे. **गलका** – गोंगाट, एका वेळी अनेकजणांनी बोलणे. **डोके वर काढणे** – एखादा विचार, भावना मनात पुन्हा पुन्हा येणे. **दंग** – मग्न. **घाबरगुंडी उडणे** – खूप घाबरणे. **नवल** – आश्चर्य. **आकाश ठेंगणे वाटणे** – खूप आनंद होणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुले कोणता खेळ खेळत होती ?

(आ) मीनलची गंमत कोण करत होता ?

(इ) पप्पूने राज्य घेण्यास नकार का दिला ?

**प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पप्पू खेळताना मीनलची गंमत कशी करायचा?

(आ) पप्पू थरथर कापत का होता ?

(इ) गुरुजी पप्पूला काय म्हणाले ?

(ई) पप्पूमधील कोणकोणते गुण तुम्हांला दिसतात ?

(उ) पप्पूचा कोणता गुण तुम्हांला घ्यावासा वाटतो ?

**प्र. ३. वाक्यांत उपयोग करा.**

(अ) आरंभ करणे.

(आ) धूम पळणे.

(इ) बट्ट्याबोळ होणे.

(ई) घाबरगुंडी उडणे.

(उ) टाळाटाळ करणे.

(ऊ) पाय लटपटणे.

(ए) आकाश ठेंगणे वाटणे.

**प्र. ४. तुमच्याकडून एखादी चूक झाली, तर तुम्ही ते आईला कसे सांगाल? तुमची चूक तुम्ही कशी सुधाराल ?**


**उपक्रम :** प्रत्येकाने शाळेच्या आवारात एक तरी झाड लावावे आणि ते वाढवण्याची जबाबदारी घ्यावी.

## आम्ही माहिती मिळवतो

- चित्रे पाहा. झाडाचे उपयोग सांगा.



**शिक्षकांसाठी :** या पाठात कडुनिंबाचे झाड, त्याचे उपयोग दाखवले आहेत. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. वेगवेगळ्या झाडांचे विविध उपयोग विद्यार्थ्यांना विचारावे, स्वतः सांगावे. 'झाडांचे उपयोग' यावर आठ ते दहा ओळी माहिती लिहिण्यास सांगावी. वर्गातील मुलांचे गट करून त्यांना परिसरातील झाडांची माहिती मिळवण्यास सांगावे.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ३ री (मराठी माध्यम) ₹३९.००